# NUTA BULLETIN

OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

Regd. No. MAHBIL/2001/4448 : Postal Registration No. ATI/RNP/078/2012-2014

YEAR : 39) 1st June 2014 (No. of 12 Pages) ( No : 07


# सर्वोच्च न्यायालयातील संघर्षाची मजबूत तयारी करण्याची आवश्यकता

*महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या सोमवार, दिनांक ७ एप्रिल २०१४ रोजी मुंबई येथील बैठकीत संमत झालेला ठराव*

महाराष्ट्रातील जवळ जवळ १० हजार नेट-सेट मुक्त शिक्षकांचा प्रश्न आता सर्वोच्च न्यायालयात जाऊन पोचला आहे. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या गेल्या ४० वर्षाच्या इतिहासातील हा सर्वात मोठा न्यायालयीन संघर्ष असून त्याला अतिशय खंबीरतेने व मजबूतपणे सामोरे जाण्यासाठी तितकीच मजबूत तयारी करणे आवश्यक झालेले आहे. या न्यायालयीन संघर्षाविषयी पुढील वाटचालीबाबतचे निश्चित धोरण ठरवणारा धोरणात्मक ठराव महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाने विचारात घेतला व संमत केला तो पुढील प्रमाणे :-

**२. मा.उच्च न्यायालयांचे निर्णय व मा. सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय :-** मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या निरनिराळ्या खंडपीठापुढे झालेल्या सुनावणीनंतर आतापावेतो एकूण १६ न्याय निर्णय मा. खंडपीठांनी दिलेले आहेत. त्यांचे तपशील **सहपत्र एक व दोन** मध्ये सोबत दिलेले आहेत. यातील काही निर्णय मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयापूर्वीचे आहेत, तर काही त्यानंतर झालेले आहेत. असे दिसून येते की दिनांक १८ नोव्हेंबर २०१३ रोजी, सन २०१३ च्या राज्यशासनाच्या विशेष अनुमती याचिका (Special Leave Petition) क्रमांक ३४११८ वर, मा. सर्वोच्च न्यायालयाने एक अंतरिम आदेश पारित केला. तो अंतरिम आदेश पुढील प्रमाणे :-

"We are of the view that following the UGC Notification/ Letter dated 4.11.2008, those teachers who have not passed NET/SET examination but who have completed six years of service as on that date should be entitled to the benefits of career advancement scheme only for the purpose of pay-scales. According to us such an interim order for that limited purpose will meet ends of justice."

**३. गुणवत्तेवर आधारित मा. उच्च न्यायालयाचे निर्णय :-** मा. उच्च न्यायालयांच्या या सर्व निर्णयांची बारकाईने पहाणी केली असता कागदपत्रे व युक्तिवादांच्या मूल्यमापनानंतर गुणवत्तेवर काही निर्णय झाले असून त्यामध्ये याचिकाकर्त्यांतर्फे करण्यात आलेला युक्तिवाद, याचिकाकर्त्यांच्या तर्फे सादर करण्यात आलेली कागदपत्रे न्यायालयाने लक्षात घेतली व त्याचबरोबर शासनाच्या वतीने उत्तरादाखल सादर करण्यात आलेली प्रतिज्ञापत्रे, सोबतची कागदपत्रे व युक्तीवाद ह्या सर्व गोष्टी विचारात घेऊन गुणवत्तेवर मा. उच्च न्यायालयाने हे निर्णय दिलेले असून त्यांची संख्या **सात** आहे. यांना आपण "मा. सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय होण्यापूर्वीचे मा. उच्च न्यायालयाचे निर्णय" असे म्हणू. ते निर्णय कोणत्या खंडपीठाने दिलेले आहेत, कोणत्या प्रकरणात दिलेले आहेत व कोणत्या तारखेला दिलेले आहेत याची यादी **सहपत्र : एक** म्हणून सोबत दिलेली आहे.

**४. तांत्रिकतेवर आधारित मा. उच्च न्यायालयाचे निर्णय :-** एकदा मा. सर्वोच्च न्यायालयाचा उपरोक्त प्रमाणे अंतरिम आदेश (Interim order) झाल्यानंतरच्या काळात मा. उच्च न्यायालयाच्या विविध खंडपीठांचे जेवढे निर्णय झाले ते सारे निर्णय शिक्षकांना अनुकूल असले तरी ते निर्णय युक्तिवादाच्या व कागदपत्रांच्या तौलनिक मूल्यमापनानंतर देण्यात आलेले नसून सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयावर आधारित आहेत. न्यायालयीन कामकाजाची कायदे व नियमांनी लाऊन दिलेली जी शिस्त आहे, त्या शिस्तीप्रमाणे एकदा मा. सर्वोच्च न्यायालयाचा आदेश किंवा अंतरिम आदेश निर्गमित झाला की कोणतेही उच्च न्यायालय त्या निर्णयापेक्षा वेगळा किंवा विरोधात निर्णय देऊ शकत नाही. नियमांनी अस्तित्वात आलेली ही तांत्रिकता लक्षात घेता त्यानंतरचे सर्व निर्णय नियमांच्या तांत्रिकतेवर आधारित आहेत हे लक्षात यायला वेळ लागत नाही. अशा निर्णयांची संख्या नऊ आहे. यांना आपण "मा.सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय झाल्यानंतरचे मा. उच्च न्यायालयाचे निर्णय" म्हणू. त्यांचे तपशील **सहपत्र : दोन** मध्ये नमूद केलेले आहेत. या सर्व निर्णयामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाचा अंतरिम आदेश उधृत केला असून त्याप्रमाणे कारवाई करण्याचे आदेश मा. उच्च न्यायालयाच्या विविध खंडपीठांनी दिलेले आहेत व त्या बहुतेक आदेशात हा आदेश सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून देण्यात आलेला आहे असेही नमूद आहे. याचा अर्थ असा की उद्या मा. सर्वोच्च न्यायालयाचा अंतरिम आदेश या प्रकरणाचा अंतिम निर्णय होईपर्यंतच्या कालखंडासाठी कायम झाला तर उच्च न्यायालयाच्या या खंडपीठांचे हे सर्व आदेशसुद्धा कायम रहातील. मात्र जर मा. सर्वोच्च न्यायालयाने अंतरिम आदेश रद्द केला (व्हेकेट) तर हे सर्व निर्णयसुद्धा कोसळून पडतील. हे लक्षात घेतले पाहिजे.

**५.** यापुढे यासंदर्भात महाराष्ट्रातील कोणत्याही खंडपीठासमोर युक्तिवादाच्या किंवा गुणवत्तेच्या आधारावर निर्णय होतील ही शक्यता नाही, तर ते तांत्रिकतेच्या आधारावरच होतील. सर्वोच्च न्यायालयाच्या आधारावर अंतरिम आदेश दिले जातील आणि म्हणूनच मा. उच्च न्यायालयासमोरील संघर्ष हा आता जवळ जवळ संपलेला आहे व हा संघर्ष मा. सर्वोच्च न्यायालयात जाऊन पोचला आहे, असे ठामपणे समजून पुढील कामाची बांधणी केली पाहिजे.

**६.** नेट-सेट मुक्त शिक्षकांच्या बाबतीत महत्त्वाच्या कोणत्या मुद्यांवरून हा वाद चालू आहे? राज्य शासनाला कोणते मुद्दे माहीत नसल्यामुळे किंवा मान्य नसल्यामुळे हा संघर्ष चालू आहे? याची माहिती करून घेणे आवश्यक आहे. ते मुद्दे पुढील प्रमाणे :-

(१) सन १९९१ ते २००० या काळात नेट-सेटची पात्रता शिक्षकांच्या भरतीसाठीची सक्तीची पात्रता म्हणून महाराष्ट्रामध्ये कायद्याने लागूच करण्यात आलेली नव्हती.

(२) विद्यापीठ अनुदान आयोगाचे सन १९९१ चे नेट-सेट पात्रता प्रस्तावित करणारे रेग्युलेशन हे मा. सर्वोच्च न्यायालयाच्या १९९४ च्या निर्णयाप्रमाणे शिफारशींच्या स्वरुपाचे होते.

(३) सर्वोच्च न्यायालयाच्या त्याच निर्णयाप्रमाणे सन १९९१ चे रेग्युलेशन कायद्याने लागू करण्याचे ठरवले तर ते पूर्वलक्षी प्रभावाने लागू करता येणार नाहीत.

(४) सन १९९१ ते २००० या काळामध्ये सेवेत भरती झालेले हे सर्व प्राध्यापक भरतीच्या वेळी कायद्याने विहित केलेली पात्रता धारण करीत होते. कायद्याने निर्माण केलेल्या निवड समितीमार्फत त्यांची निवड करण्यात आलेली होती व त्यांच्या या निवडीला विद्यापीठांची व मा. कुलगुरुंची यथोचितरित्या विधिमय मान्यता मिळालेली होती. त्या त्या वेळच्या नियम, परिनियमाप्रमाणे ते सेवेत कायम झालेले आहेत व त्यांच्या वेतनावर १०० टक्के वेतन अनुदान नेमणुकीच्या पहिल्या दिवसापासून तर आजपर्यंत शासनातर्फे देण्यात आलेले आहे. देण्यात येत आहे.

(५) खरे म्हणजे त्यांच्या नेमणुका तदर्थ नव्हत्याच, त्या नेमणुका नियमित स्वरुपाच्या होत्या. तथापि विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियम, परिनियमानुसार

तदर्थ सेवासुद्धा स्थाननिश्चितीच्या प्रयोजनासाठी धरली पाहिजे.

(६) विद्यापीठाच्या परिनियमांनी किंवा कुलगुरुंच्या निदेशानी किंवा राज्य शासनाच्या 'स्टँडर्ड कोड'नी नेट-सेटची पात्रता १९९१ ते २००० या काळात विधिमयरित्या विहित करण्यात आलेली नव्हती.

(७) शासन निर्णयांनी अशी पात्रता विहित करता येत नाही, हे तर खरेच पण असा शासननिर्णयसुद्धा त्या कालखंडामध्ये निर्गमित झालेला नव्हता, हे आता स्पष्ट झालेले आहे. अशी पात्रता सक्तीची करणारा एक शासन निर्णय २३ ऑक्टोबर १९९२ रोजी निर्गमित करण्यात आलेला होता पण तो पुढच्या ३५ दिवसामध्ये रद्द करण्यात आला होता. त्यानंतर २००० पर्यंतच्या काळात अशी पात्रता विहित करणारा कोणताही शासननिर्णय अस्तित्वात नाही हे आता उघड झाले आहे. अशी पात्रता सक्तीची करण्यात आलेली आहे असे गृहीत धरून पुढील कारवाया करणारे जे शासन निर्णय त्या काळात निघाले ते याकामी निरुपयोगी ठरतात.

(८) ऑक्टोबर २००१ मध्ये याबाबतीत निघालेला शासननिर्णय १९९१ ते २००० या काळात झालेल्या नेमणुकासाठी निरुपयोगी आहे याचे कारण तो पूर्वलक्षी प्रभावाने लागू करणे बेकायदेशीरपणाचे आहे. ही गोष्टसुद्धा आता स्पष्ट झालेली आहे.

(९) या एकाच प्रकारातील नेट-सेट मुक्त शिक्षकांपैकी जवळ जवळ ३ हजार शिक्षकांना नेमणुकीच्या दिनांकापासून त्यांची सेवा धरून सर्व आर्थिक लाभ यापूर्वीच देण्यात आलेले आहेत.

**७.** दरम्यानच्या काळामध्ये फेब्रुवारी २०१४ च्या पहिल्या आठवड्यात दिनांक ६ फेब्रुवारी २०१४ रोजी **मा. सर्वोच्च न्यायालयाचा एक महत्वपूर्ण निर्णय** झाला आहे. "IN THE SUPREME COURT OF INDIA : CIVIL APPELLATE JURISDICTION : CIVIL APPEAL NOs.I0103-I0106 OF 2010 **WITH** C.A.NOS.10107-10108, 10110-10114, 10116-10121. 10123 OF 2010 AND C.A.N0.4035 OF 2007." या प्रकरणात अे.आर.दवे व अे.के. सिक्री या मा. न्यायमूर्तींच्या खंडपीठाने या निर्णयाच्या परिच्छेद ३२ मध्ये पुढील प्रमाणे नमुद केले आहे. :- "Before laying down any policy which would give benefits to its subjects, the State must think about *pros and cons* of the policy and its capacity to give the benefits. Without proper appreciation of all the relevant factors, the State should not give any assurance, not only because that would be in violation of the principles of promissory estoppel but it would be unfair and immoral on the part of the State not to act as per its promise." "कोणताही लाभ देण्यासंबंधी धोरण आखतांना राज्य सरकारने त्याच्या चांगल्या-वाईट परिणामांचा विचार करावा. तसेच लाभ देण्याची क्षमताही जोखावी," असे नमूद करतांनाच **मा. ए.आर दवे आणि ए.के.सिक्री या न्यायमूर्तीद्वयांच्या खंडपीठाने** असे स्पष्ट केले की. "सर्व तर्कसंगत बाबींचे मूल्यांकन न करता राज्याने कोणतेही आश्वासन देऊ नये. आश्वासनानुसार सरकार काम करीत नसेल तर ते केवळ वचनपूर्तीच्या तत्त्वांचेच उल्लंघन ठरत नाही, तर नैतिकतेच्या कसोटीला धरून होत नाही." हा निर्णय केरळ राज्याबद्दलचा व उद्योगांना दिलेल्या आश्वासनासंबंधी आहे हे खरे असले तरी मा. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयाच्या आधारे महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाला देण्यात आलेली अनेक आश्वासने व सभागृहात देण्यात आलेली अनेक आश्वासने मा. सर्वोच्च न्यायालयाच्या लक्षात आणून देणे, या प्रकरणी निश्चितपणे उपयुक्त होईल.

**८.** महाराष्ट्रामध्ये सन १९९१ ते २००० या काळात विधिवतरित्या सेवेत आलेल्या नेट-सेट मुक्त शिक्षकांची संख्या अंदाजे १० हजार आहे. त्यापैकी जवळ जवळ ३००० शिक्षकांना नेमणुकीच्या दिनांकापासून त्यांची सेवा धरून सर्व आर्थिक लाभ यापूर्वीच प्राप्त झालेले आहेत. मात्र गेल्या वर्ष दोन वर्षामध्ये त्यांच्याकडून ते लाभ रिकव्हरीच्या माध्यमातून परत घेण्याचे संचालक व सहसंचालक यांच्या कार्यालयानी केलेले प्रयत्न या शिक्षकांनी न्यायालयात संघर्ष करून हाणून पाडले आहेत. असा प्रयत्न हाणून पाडणारे मा. उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने दिलेले निरनिराळे **पाच** निर्णय आतापर्यंत उपलब्ध झाले असून ते ***सहपत्र : तीन*** मध्ये दिलेले आहे.

**८.१** नेमणुकीच्या दिनांकापासून या शिक्षकांना देण्यात आलेले हे लाभ त्यांच्याकडून काढून घेण्याचा संचालक व सहसंचालक कार्यालयाचा प्रयत्न हाणून पाडणारे मा. उच्च न्यायालयाच्या विविध खंडपीठांनी जे निर्णय दिलेले आहेत ते मुख्यत्वे दोन प्रकारात मोडतात. **एक म्हणजे तांत्रिक कारणावरून देण्यात आलेले निर्णय.** रिकव्हरी काढण्यासाठी जी कायदेशीर प्रक्रिया पार पाडावी लागते तिचे

*( सहपत्र : एक )* (ठरावाचा परिच्छेद २ व ३ पहा)

## *मा. सर्वोच्च न्यायालयाचा १८ नोव्हेंबर २०१३ रोजीचा निर्णय होण्यापूर्वीचे मा. उच्च न्यायालयाचे निर्णय*

**(1) W.P. No. (L) 1326 OF 2012 :-** IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY ORDINARY ORIGINAL CIVIL JURISDICTION WRIT PETITION (LODGING) NO.1326 OF 2012 Akhil Bharatiya Vidyarthi Parishad and anr. .. Petitioners. Versus The State of Maharashtra and ors. .. Respondents CORAM : MOHIT S. SHAH, C.J. & M.S. SANKLECHA, J.DATE : 10 May 2013. ( P 61B 2013)

**(2) W.P. No. 11477 OF 2010 :-** IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY BENCH AT AURANGABAD WRIT PETITION NO.11477 OF 2010 CORAM : A. H. JOSHI & SUNIL P. DESHMUKH, JJ. JUDGMENT RESERVED ON 23RD JULY, 2013. JUDGMENT PRONOUNCED ON 1ST AUGUST, 2013 ORAL JUDGMENT ( PER A.H. JOSHI, J ) ( P 114 B2013)

**(3) W.P. No. 5271 OF 2013 :-** IN THE HIGH COURT OF JUDICATURE OF BOMBAY BENCH AT AURANGABAD WRIT PETITION NO.5271 OF 2013 CORAM : MOHIT S. SHAH, C.J. AND SUNIL P.DESHMUKH, J. DATE : 28 th AUGUST 2013 JUDGMENT (PER SUNIL P.DESHMUKH, J.) ( P 145 B 2013)

**(4) W.P. No. 4994 OF 2013 :-** IN THE HIGH COURT OF JUDICATURE OF BOMBAY BENCH AT AURANGABAD WRIT PETITION NO. 4994 OF 2013 [CORAM : R . M. BORDE AND SUNIL P.DESHMUKH, J.J.] DATE : 13 th SEPTEMBER 2013 JUDGMENT (PER SUNIL P.DESHMUKH, J.) ( P 205 B 2013)

**(5) W.P.No.6659 OF 2013 :-**IN THE HIGH COURT OF JUDICATURE OF BOMBAY BENCH AT AURANGABAD WRIT PETITION NO.6659 OF 2013 Dr.Uttam Pralhadrao Dolhare and Ors... Petitioners VERSUS The State of Maharashtra, through its Secretary, Higher Education Department, Mantralaya, Mumbai. and Ors....Respondents CORAM : R.M.BORDE & SUNIL P.DESHMUKH, JJ. DATE :10th October, 2013. ORAL JUDGMENT (Per Sunil P. Deshmukh, J.) ( P 216 B 2013)

**(6) W.P. No. 3122 OF 2013 :-** IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY CIVIL APPELATE JURISDICTION WRIT PETITION NO.3122 OF 2013 Smt.Kamble Manisha Navanath ...Petitioner VERSUS The State of Maharashtra through Principal Secretary Department of Higher and Technical Education & Ors. ...Respondents CORAM A.S.OKA, & REVATI MOHITE DERE,JJ. DATE : SEPTEMBER 26,2013 ( P 218 B 2013)

**(7) W.P. No. 10149 OF 2010 :-** IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY,BENCH AT AURANGABAD. WRIT PETITION NO. 10149 OF 2010 Dr. Mahesh S/o Prabhakar Kulthe & Ors... PETITIONERS VERSUS The Union of India through The Secretary in the Department of Human Resources Development Shastri Bhavan, New Delhi & Ors ...RESPONDENTS CORAM R. M. BORDE AND SUNIL P. DESHMUKH, JJ. OCTOBER 17, 2013 Judgment (Per: Sunil P. Deshmukh, J.) ( P 234 B2013)

पालन न करता रिकव्हरी करण्यात आली, या तांत्रिक कारणावरून सहसंचालकांचे आदेश काही प्रकरणी रद्द ठरवण्यात आले. मा. उच्च न्यायालयांच्या अशा निर्णयांची संख्या दोन असून (**सहपत्र तीन** मध्ये ते क्रमांक १ ते २ वर नमूद केलेले आहेत.) त्या दोन्ही निर्णयात कायद्याच्या प्रक्रियेचे पालन करून रिकव्हरी काढण्याची मोकळीक शासनाला देण्यात आली आहे. शासनाची याबाबतची कुठलीच कृती कायदेशीर नसल्यामुळे पुढच्या दोन तीन वर्षात शासनाने अशा रितीने कायदेशीर प्रक्रिया पार पाडून रिकव्हऱ्या काढण्याचा कोणताही प्रयत्न केला नाही हा भाग वेगळा. याचिकाकर्त्यांच्या तर्फे सादर करण्यात आलेले युक्तीवाद व कागदपत्रे न्यायालयाने लक्षात घेतली व त्याचबरोबर शासनाच्या वतीने उत्तरादाखल सादर करण्यात आलेली प्रतिज्ञापत्रे, सोबतची कागदपत्रे व युक्तीवाद ह्या सर्व गोष्टी विचारात घेऊन **गुणवत्तेवर मा. उच्च न्यायालयाने काही निर्णय** दिलेले असून **सहपत्र तीन**मध्ये ते क्रमांक ३ ते ५ वर नमूद केलेले आहेत.

८.२ नेमणुकीच्या दिनांकापासून सेवा धरून स्थाननिश्चितीचे सर्व लाभ ज्यांना मिळालेले आहेत अशा सर्व शिक्षकांना एकत्रितरीत्या संघटित करून त्यांचे म्हणणे मा. सर्वोच्च न्यायालयासमोर मांडण्यासाठी **हस्तक्षेप याचिका** दाखल करणे आवश्यक आहे. यापूर्वी मा. उच्च न्यायालयाचे गुणवत्तेवर झालेले व तांत्रिक कारणावरून झालेले सर्व निर्णय या याचिकेच्याद्वारे मा. सर्वोच्च न्यायालयाच्या लक्षात आणून दिले पाहिजेत.

८.३ या सर्व शिक्षकांच्या हेही लक्षात आणून देणे आवश्यक आहे की उद्या सर्वोच्च न्यायालयात जो काही निर्णय होईल तो सर्व १०,००० नेट-सेट मुक्त शिक्षकांसाठी एकाच प्रकारचा होईल. ज्यांना लाभ मिळालेले नाहीत त्यांना नेमणुकीच्या दिनांकापासून लाभ देण्याचा निर्णय झाला तर ज्यांना पूर्वीच लाभ मिळालेले आहेत त्यांच्या 'रिकव्हऱ्या' काढण्याचा प्रश्नच उद्भवणार नाही. मात्र दुर्दैवाने एकदा मा. सर्वोच्च न्यायालयात त्या ७,००० शिक्षकांच्या बाबतीत विपरित निर्णय झाला तर या ३००० शिक्षकांच्या रिकव्हऱ्या काढण्याचा सपाटा शासनातर्फे सुरू केला जाईल. भारतीय संविधानामध्ये कलम १४ जोपर्यंत आहे तोपर्यंत उपरोक्त शिक्षकांचे लाभान्वित व लाभवंचित असे दोन प्रकार करून या शिक्षकांना वेगवेगळी वागणूक दिली जाणारी व्यवस्था अंततोगत्वः टिकणारी नाही हे प्रत्येकाने लक्षात ठेवले पाहिजे.

९. आजची या प्रकरणाची मा. सर्वोच्च न्यायालयातील स्थिती पहाता असे लक्षात येईल की मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेला १८ नोव्हेंबर २०१३ रोजीचा अंतरिम आदेश हा सर्व पक्षाचे म्हणणे ऐकून घेऊन कोणत्याही क्षणी कायम केला जाऊ शकेल, व्हेकेट केला जाऊ शकेल किंवा दुरुस्त केला जाऊ शकेल याची जाणीव ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. ह्या घटना सर्वोच्च न्यायालयामध्ये घडत असतांना ज्या सर्व पक्षाचे म्हणणे ऐकून घेतले जाईल त्यात आपला पक्ष किंवा आपापले पक्ष पुढील सुनावणीच्या वेळी उभा राहील किंवा उभे राहतील. याची काळजी घेणे हे अत्यंत आवश्यक झालेले आहे. सन २०१३ ची विशेष याचिका क्रमांक ३४११८ या प्रकरणाच्या निमित्ताने सर्वोच्च न्यायालयात ही सुनावणी होत असून अशा सुनावणीमुळे प्रभावित झालेल्या, होणाऱ्या किंवा होऊ शकणाऱ्या प्रत्येक पक्षाला **सहभाग याचिका दाखल करून (इंटरव्हेंशन अप्लीकेशन)** त्या याचिकेच्या सुनावणीमध्ये सहभागी होता येते व अशा सहभागासाठी मा. न्यायालयाची मान्यता मिळविणाऱ्या **सहभाग याचिका** तातडीने दाखल होणे ही आजची सर्वात महत्त्वाची व तातडीची गरज आहे. हे सर्वांनी लक्षात ठेवले पाहिजे.

*( सहपत्र : दोन )* (ठरावाचा परिच्छेद २ व ४ पहा)

## *मा. सर्वोच्च न्यायालयाचा १८ नोव्हेंबर २०१३ रोजीचा निर्णय झाल्यानंतरचे मा. उच्च न्यायालयाचे निर्णय*

**(8) W.P. No. 8316 OF 2013 :-** IN THE HIGH COURT OF JUDICATURE OF BOMBAY BENCH AT AURANGABAD WRIT PETITION NO.8316 OF 2013 Idriskhan s/o Goharkhan Pathan and others Petitioners VERSUS The State of Maharashtra & others Respondents CORAM : R.M.BORDE & A.I.S.CHEEMA, JJ. DATE : 12th December, 2013. (Per: Sunil P. Deshmukh, J.) (P04B2014)

**(9) W.P. No. 4962 OF 2012 :-** IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY APPELLATE SIDE : WRIT PETITION NO. 4962 OF 2012 Shivaji University Teachers' Association (SUTA) ... Petitioners VERSUS The University Grants Commission & ors. ... Respondents CORAM : S.C.DHARMADHIKARI AND REVATI MOHITE DERE, JJ. 19th December, 2013.(P09B2014)

**(10) W.P. No. 5073 OF 2013 :-** IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY NAGPUR BENCH, NAGPUR WRIT PETITION NO. 5073 OF 2013 (Ramesh Sheshrao Sontakke VS. State of Maharashtra thr. the Secretary, Department of Higher & Technical Education & Ors.) CORAM : B.P. DHARMADHIKARI & Z.A. HAQ, JJ. JANUARY 23, 2014. ( P 44 B 2014)

**(11) W.P. No. 6473 OF 2013 :-** IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY NAGPUR BENCH AT NAGPUR WRIT PETITION NO.6473/2013 Shashank Janardan Aglawe and others VERSUS State of Maharashtra, through Principal Secretary, Higher and Technical Education Department, Mantralaya, Mumbai – 32 and others CORAM : B.P. DHARMADHIKARI AND Z.A. HAQ, JJ. DATE : 30.1.2014 ( P 45 B 2014)

**(12) W.P. No. 7421 OF 2013 :-** IN THE HIGH COURT OF JUDICATURE OF BOMBAY BENCH AT AURANGABAD WRIT PETITION NO.7421 OF 2013 Dr.Kishor s/o Govind Kolhe & others Petitioners VERSUS The State of Maharashtra & others Respondents CORAM : R.M.BORDE & N.W. SAMBRE, JJ. DATE :21ST JANUARY, 2014 **Judgment circulated on page 93 of 2014 NUTA Bulletin.**

**(13) W.P. No. 10383 OF 2013 :-** IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY BENCH AT AURANGABAD WRIT PETITION NO. 10383 OF 2013 Dr Sheshrao Venkatrao Shete and another VS The State of Maharashtra and others ALONG WITH WRIT PETITION NO. 10385 OF 2013 Dr Vilas Bapurao Aghav VS The State of Maharashtra and others CORAM : R. M. BORDE & N. W. SAMBRE, JJ.DATE : JANUARY 13TH, 2014 **Judgment circulated on page 93 of 2014 NUTA Bulletin.**

**(14) W.P. No. 1129 OF 2014 :-** IN THE HIGH COURT OF JUDICATURE OF BOMBAY BENCH AT AURANGABAD WRIT PETITION NO.1129 OF 2014 Dr. Suresh Bhaskar Dhake & ors. ..PETITIONERS VERSUS The State of Mah. & ors. ..RESPONDENTS WITH WRIT PETITION NO.10370 OF 2013 Rajendra Rakhamaji Dandwate & ors. ..PETITIONERS VERSUS The State of Mah. & ors. ..RESPONDENTS CORAM : R.M.BORDE & N.W. SAMBRE, JJ. DATE : 21ST FEBRUARY, 2014 **Judgment circulated on page 94 of 2014 NUTA Bulletin**

**(15) W.P. No. 8316 OF 2013 :-** IN THE HIGH COURT OF JUDICATURE OF BOMBAY BENCH AT AURANGABAD WRIT PETITION NO.8316 OF 2013Dr. Idriskhan s/o Goharkhan Pathan & ors. ..PETITIONERS VERSUS The State of Mah. & ors. ..RESPONDENTS WITH WRIT PETITION NO.8279 OF 2013 Vishwas s/o Nimba Koli & ors. ..PETITIONERS VERSUS The State of Mah. & ors. ..RESPONDENTS CORAM : R.M.BORDE & A.I.S.CHEEMA, JJ. DATE : 12TH DECEMBER, 2013 **Judgment circulated on page 95 of 2014 NUTA Bulletin**

**(16) W.P. No. 6325 OF 2013 :-** IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY NAGPUR BENCH AT NAGPUR WRIT PETITION NO.6325/2013 Dr. Anil Shivrangji Dahat and others VERSUS State of Maharashtra, through Principal Secretary, Higher and Technical Education Department, Mantralaya, Mumbai – 32 and others CORAM : B.P. DHARMADHIKARI AND P.R. BORA, JJ. DATE : 5th March 2014 **Judgment circulated on page 96 of 2014 NUTA Bulletin**

**१०.** राज्य शासनाची लहान लहान प्रकरणातसुद्धा विशेष अनुमती याचिका (Special Leave Petition) दाखल करण्याची तसेच एकदा विशेष अनुमती याचिकेचा निकाल लागल्यावर पुन्हा पुनर्विचार याचिका (Review Petition) दाखल करण्याची या संदर्भातील आकसबुद्धीची वाटचाल लक्षात घेण्यासारखी आहे. याबाबतचे काही नमुने पुढील प्रमाणे :-

**१०.१ ग्रॅच्युईटीच्या बाबतचा निर्णय** :- १ जानेवारी २००६ नंतर पण २१ ऑगस्ट २००९ पूर्वी सेवानिवृत्त झालेल्या विद्यापीठीय व महाविद्यालयीन प्राध्यापकांना तसेच इतरही अधिकारी व कर्मचारी यांना सेवानिवृत्ती समयी अदा करावयाच्या ग्रॅच्युईटी संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ३० जानेवारी २०१३ रोजी "In the result, the appeal is allowed and the impugned order is set aside. **The cut-off date, i.e. 01.09.2009 specified in G.R.dated 21.08.2009 is declared unconstitutional**" असा निर्णय दिला व त्यामुळे १ जानेवारी २००६ नंतर सेवानिवृत्त झालेल्या काही शिक्षकांना ५ लक्ष रूपये व काही शिक्षकांना ७ लक्ष रूपये ग्रॅच्युईटी अदा करण्याचा राज्य शासनाचा भेदभाव करणारा शासन निर्णय रद्द झाला. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या त्या निर्णयाच्या आधारे मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने "SHIVAJI UNIVERSITY TEACHERS ASSOCIATION (SUTA), Through Secretary, Dr.R.H. Patil and Ors. ...PETITIONERS. ***VERSUS*** The State of Maharashtra, Through the Secretary, Ministry of Higher And Technical Education and Anr. ...RESPONDENTS." या सन २०१३ च्या याचिका क्रमांक ६३६९ मध्ये दिनांक ३ सप्टेंबर २०१३ रोजी "We direct the State Government to take a policy decision on the basis of the order of the Apex Court dated 30th January, 2013, within a period of four weeks from today;" असा निर्णय दिला चार आठवड्याच्या आत शासनाने धोरणात्मक निर्णय तर घेतला नाहीच पण आकसाने पुनर्विचार याचिका (Review Petition) दाखल केली. मा. सर्वोच्च न्यायालयाने राज्य शासनाची ही पुनर्विलोकन याचिका दिनांक १३.१०.२०१३ रोजी "The review petition is accordingly dismissed." या शब्दात डिसमिस केली. **तरी अजूनही राज्य शासनाने याबाबतीत धोरणात्मक निर्णय निर्गमित केलेला नाही.**

**१०.२** सन १९९६ नंतर निवडश्रेणीमध्ये गेलेल्या व त्या श्रेणीत पाच वर्षाची सेवा ज्यांनी पूर्ण केलेली आहे, अशा शिक्षकांची **१४९४०** च्या टप्प्यावर वेतननिश्चिती करण्याचा लाभ न देण्याबाबत राज्य शासनाने स्वीकारलेले कमालीच्या आकसाचे धोरण मा. उच्च न्यायालयातील अनेक निर्णयांनी निष्प्रभावी ठरविले आहे. संघटनेच्या कार्यालयात या संदर्भात उपलब्ध असलेले मा. उच्च न्यायालयाचे निर्णय पुढील प्रमाणे :-

(१) मा. मुंबई खंडपीठाने सन २०११ च्या याचिका क्रमांक ९२१८ मध्ये दिनांक २९ फेब्रुवारी २०१२ रोजी दिलेला निर्णय, (P31NB2012) (२) मा. मुंबई खंडपीठाने सन २०११ च्या याचिका क्रमांक ४४७५ मध्ये दिनांक २० मार्च २०१३ रोजी दिलेला निर्णय, (P66NB2012) (३) मा. नागपूर खंडपीठाने सन २०१२ च्या याचिका क्रमांक १९६० मध्ये दिनांक ३० एप्रिल २०१३ रोजी दिलेला निर्णय, (P83NB2013) (४) मा. औरंगाबाद खंडपीठाने सन २०११ च्या याचिका क्रमांक ६८९४ मध्ये दिनांक २७ एप्रिल २०१२ रोजी दिलेला निर्णय, (P66NB2012) (५) मा. नागपूर खंडपीठाने सन २०१२ च्या याचिका क्रमांक ८५३ मध्ये दिनांक २९ नोव्हेंबर २०१२ रोजी दिलेला निर्णय, (P99NB2012) (६) मा. नागपूर खंडपीठाने सन २०१३ च्या याचिका क्रमांक ३०९४ मध्ये दिनांक २७ जून २०१३ रोजी दिलेला निर्णय, (P109NB2013) (७) मा. नागपूर खंडपीठाने सन २०१३ च्या याचिका क्रमांक १०२१ मध्ये दिनांक २ ऑगस्ट २०१३ रोजी दिलेला निर्णय, (P117NB2013) (८) मा. नागपूर खंडपीठाने सन २०१२ च्या याचिका क्रमांक ६२५६ मध्ये दिनांक १९ ऑक्टोबर २०१३ रोजी दिलेला निर्णय, (P11NB2014) (९) मा. नागपूर खंडपीठाने सन २०१२ च्या याचिका क्रमांक ६२५७ मध्ये दिनांक १९ ऑक्टोबर २०१३ रोजी दिलेला निर्णय,(P36NB2014) (१०) मा. नागपूर खंडपीठाने सन २०१३ च्या याचिका क्रमांक ४५४ मध्ये दिनांक १९ ऑक्टोबर २०१३ रोजी दिलेला निर्णय, (P222NB2013) (११) मा. नागपूर खंडपीठाने सन २०११ च्या याचिका क्रमांक २६३३ मध्ये दिनांक १४ ऑक्टोबर २०११ रोजी दिलेला निर्णय. (P78NB2014) प्रत्यक्ष या प्रकरणी आणखीही कितीतरी निर्णय मा. उच्च न्यायालयानी दिलेले आहेत. उपरोक्त दहा निर्णय संघटनेच्या कार्यालयात उपलब्ध असल्याने त्यांचीच फक्त माहिति वर दिलेली आहे.

**१०.२.२** उच्च न्यायालयाच्या इतक्या खंडपीठांनी निर्णय दिल्यानंतर राज्यशासनाने खरे म्हणजे त्या निर्णयाची अंमलबजावणी करावयास पाहिजे होती पण तशी ती केली नाही. म्हणून अवमान याचिका दाखल झाल्या. उच्च शिक्षण सचिवांना उच्च न्यायालयात क्षमा मागावी लागली. पण राज्य शासनाने निगरगट्टपणा सोडला नाही. मा. उच्च न्यायालयातच पुनर्विचार याचिका (Review Petition) दाखल केली. "CIVIL APPLICATION (CAO) NO.1021/2013 IN M.C.A. ST. NO.11599/2013 (FOR REVIEW) IN WRIT PETITION NO.853/2012 (D)" या प्रकरणी मा. उच्च न्यायालयाच्या मा. नागपूर खंडपीठाने ती याचिका फेटाळून लावली. सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका (Special Leave Petition) दाखल करण्याची मुदत निघून गेली होती पण आकसबुद्धी एवढी

*( सहपत्र : तीन )* (ठरावाचा परिच्छेद ८.१ पहा)

## *नेट-सेटमुक्त शिक्षकांना नेमणूकीच्या दिनांकापासून सर्व लाभ अदा करण्यात आलेले असतांना 'रिकव्हऱ्या' काढण्याचे प्रयत्न हाणून पाडणारे मा. उच्च न्यायालयांच्या विविध खंडपीठांचे निर्णय*

(अ) तांत्रिक कारणावर आधारित

**(1) W.P. No. 1893 OF 2010 :-** IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY CIVIL APPELLATE JURISDICTION : WRIT PETITION NO.1893 OF 2010 Pramod D.Sonawane ...Petitioner v/s. State of Maharashtra & ors. ...Respondents CORAM: D.K.Deshmukh & N.D.Deshpande,JJ DATED: 3RD SEPTEMBER, 2010 ( P 8 B 2012)

**(2) W.P. No. 1991 OF 2011 :-** IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAYBENCH AT AURANGABAD WRIT PETITION NO. 1991 OF 2011 Sheshrao Vyankatrao Shete & another PETITIONERS VERSUS The State of Maharashtra and others RESPONDENTS CORAM : D.B. BHOSALE & M.T. JOSHI, JJ. DATED : 28th MARCH, 2011 ( P 9 B 2012)

*(ब) गुणवत्तेवर आधारित*

**(3) W.P. No. 5271 OF 2013 :-** IN THE HIGH COURT OF JUDICATURE OF BOMBAY BENCH AT AURANGABAD WRIT PETITION NO.5271 OF 2013 CORAM : MOHIT S. SHAH, C.J. AND SUNIL P.DESHMUKH, J. DATE : 28 th AUGUST 2013 JUDGMENT (PER SUNIL P.DESHMUKH, J.) ( P 145 B 2013)

**(4) W.P. No. 4994 OF 2013 :-** IN THE HIGH COURT OF JUDICATURE OF BOMBAY BENCH AT AURANGABAD WRIT PETITION NO. 4994 OF 2013 [CORAM : R . M. BORDE AND SUNIL P.DESHMUKH, J.J.] DATE : 13 th SEPTEMBER 2013 JUDGMENT (PER SUNIL P.DESHMUKH, J.) ( P 205 B 2013)

**(5) W.P. No. 6659 OF 2013 :-** IN THE HIGH COURT OF JUDICATURE OF BOMBAY BENCH AT AURANGABAD WRIT PETITION NO.6659 OF 2013 Dr.Uttam Pralhadrao Dolhare and Ors... Petitioners VERSUS The State of Maharashtra, through its Secretary, Higher Education Department, Mantralaya, Mumbai. and Ors....Respondents CORAM : R.M.BORDE & SUNIL P.DESHMUKH, JJ. DATE :10th October, 2013. ORAL JUDGMENT (Per Sunil P. Deshmukh, J.) ( P 216 B 2013)

जोरदार की राज्य शासनाने सर्वोच्च न्यायालयामध्येसुद्धा याबाबतीत विशेष परवानगी मागणारा अर्ज दाखल करण्याची मुदत निघून गेली असली तरी अपिलासाठी विशेष परवानगी मागणारी याचिका दाखल केली. ती याचिका दिनांक ३१ जानेवारी २०१३ रोजी मा. सर्वोच्च न्यायालयात सुनावणीसाठी आली व ती विलंबाने आल्याच्या कारणावरून मा. सर्वोच्च न्यायालयाने डिसमिस केली. "The special leave petition is **DISMISSED** on the ground of delay." दुर्दैवाची व लाजीरवाणी गोष्ट अशी की राज्य शासनाच्या वतीने सर्वोच्च न्यायालयात याच संदर्भात आणखी दोन प्रकरणे दाखल करण्यात आलेली आहेत. **पहिल्या प्रकरणाचा** सर्वोच्च न्यायालयातील Diary No. 1022 of 2014 असा असून ते प्रकरण Special leave petition (Civil 2475 of 2014) म्हणून आता दाखल झालेले आहे. **दुसऱ्या प्रकरणाचा** Diary No. 1023 of 2014 असून ते प्रकरण Special leave petition (Civil 4438-39 of 2014) म्हणून आता दाखल झालेले आहे.

**१०.२.३** मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक २४ मार्च २०१४ रोजी "Petition(s) for Special Leave to Appeal (Civil) 2014 CC 4438-4439/2014 From the judgement and order dated 29/11/2012 in WP No.853/2012, dated 02/08/2013 in WP No.853/2012,CA No .1021/2013MCA No .11599/2013 of The HIGH COURT OF BOMBAY AT NAGPUR : STATE OF MAHARASHTRA & ORS ......*Petitioner(s)* ***VERSUS*** ARUN BABULAL PATIL & ORS .........*Respondent (s)*" या प्रकरणामध्ये प्रकरण दाखल करून घेण्यास "Leave granted" या शब्दात परवानगी दिली असून सोबत त्याच दिवशी "If the respondents have any other claim, they may agitate the issue before the appropriate forum and it has nothing to do with the pendency of these cases." असे आदेश पारित केलेले आहेत. सारांश काय तर प्रतिवादींना शासनाकडे काही घेणे असल्यास त्यांनी ते यथोचित प्राधिकरणासमोर जावून प्राप्त करून घ्यावे. येथे प्रकरण प्रलंबित आहे या कारणावरून त्यात कोणतीही बाधा येणार नाही असे हे आदेश आहेत. १४९४० च्या प्रकरणी एका बाबतीत अपील दाखल करणाती विशेष अनुमती प्रदान करण्यात आल्यामुळे तेथे संघटीतपणे बाजू मांडणे हे पर्यायाने क्रमप्राप्त आहे.

**१०.३** समाजकार्य व आयुर्वेद महाविद्यालयातून काम करणाऱ्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना पेन्शन योजना लागू करण्याच्या बाबतीतसुद्धा राज्य शासनाने न्यायालयात खटले दाखल करण्याचा सपाटाच लावून दिलेला होता असे दिसून येते.

**१०.३.१** अनुदानित आयुर्वेद महाविद्यालयातून पेन्शन योजना लागू करण्याबाबत मा. मुंबई उच्च न्यायालयापुढे १९९२ मध्ये याचिका क्र. ३५०८ दाखल करण्यात आली होती. याचिकाकर्त्यांचे मुख्य म्हणणे असे होते की, **(अ)** वेतनश्रेण्या तसेच विद्यावेतने यांची शासकीय व अशासकीय आयुर्वेद महाविद्यालयामध्ये एकसारखी पुनर्रचना झालेली आहे. मात्र असे असले तरी निवृत्तीवेतन व उपदान योजना या सुविधांच्या बाबतीत **शासकीय व अशासकीय अनुदानित आयुर्वेद महाविद्यालयातील शिक्षकांमध्ये भेदभाव करण्यात आलेला आहे. (ब)** इकडे दुसऱ्या बाजूला २१ जून १९८३ च्या शासन निर्णयान्वये कला, वाणिज्य, विज्ञान व शिक्षण शाखांतर्गत खाजगी अनुदानीत महाविद्यालयातील शिक्षकांना निवृत्ती वेतन योजना लागू झालेली आहे. **खाजगी अनुदानित आयुर्वेद महाविद्यालयांना मात्र त्यापासून वंचित ठेवण्यात आलेले आहे.** उपरोक्त दोन मुद्यातून स्पष्ट होणारा भेदभाव हा भारतीय संविधानाच्या खंड १४ नुसार प्रदान केलेल्या समतेच्या हक्काचा भंग करणारा आहे.

**१०.३.२** या प्रकरणात (सन १९९२ ची याचिका क्रमांक ३५०८) मा. उच्च न्यायालयाच्या मुंबई खंडपीठाने दिनांक १४ जून १९९६ रोजी निर्णय दिला. मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या या निर्णयामध्ये शासनाचा उपरोक्त नकारार्थी निर्णय हा भारतीय संविधानाच्या खंड १४ व १६ यांनी दिलेल्या समानतेच्या अधिकारांचा भंग करणारा आहे. असा सरळ सरळ निष्कर्ष काढण्यात आला होता तो पुढील शब्दात :- "The disparity in the service conditions in not affording the benefit of pension-cum-gratuity scheme to the teaching and non-teaching employees of non-government aided Ayurvedic and unani Colleges affiliated to Universities...... is discriminatory and clearly violate the rules of equality before law and equal protection of law as enshrined under **articles 14 & 16 of the constitution of India.**" मा. खंडपीठाने याच निर्णयात पुढील प्रमाणे आदेश दिलेला होता. "The State Government was directed to implement the Pension and Gratuity Scheme for the petitioners in respect of employees in Colleges and Hospitals in any event with effect from 25.05.1981"

**१०.३.३** मा. उच्च न्यायालयाने दिनांक १४ जून १९९६ रोजी जो निर्णय दिला, त्या निर्णयावर महाराष्ट्र शासनाने सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल केले. प्रकरण आपल्या विरोधात जात आहे असे पाहून या अपिलाची सुनावणी होत असतांना **राज्य शासनाच्या वतीने सर्वोच्च न्यायालयात असे सांगण्यात आले की राज्य शासनाची आर्थिक परिस्थिती ठीक नसल्यामुळे आम्ही टप्प्याटप्प्याने ही योजना लागू करीत आहोत.** सर्वांना एकाचवेळी योजना लागू करण्यामुळे राज्य शासनाचे हात बांधले जातील ही बाब न्यायालयाने लक्षात घ्यावी. महाराष्ट्र शासनाच्या वकीलांनी मांडलेले हे प्रतिपादन सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयात नोंदले गेले आहे. ते पुढील शब्दात "Learned Senior Counsel appearing for the State, has contended that in view of the huge financial outlay, the Government has been, in a phased manner, extending the benefits from time to time and, therefore, the direction cannot be given to tie down the hands of the Government to extend all the benefits to all of them at a stretch." मा. सर्वोच्च न्यायालयाने राज्य शासनाचे उपरोक्त म्हणणे लक्षात घेऊन दिनांक ७ एप्रिल १९९७ रोजी याबाबतीत पुढील प्रमाणे निर्णय दिला. "**Government is not intending to deny the benefit to the segment of the teachers, we appreciate the stand taken by the Government.** The Government is, therefore, directed to consider extension of the benefit of pension and gratuity scheme to the teachers working in the Ayurvedic, Unani and Homeopathic aided educational institutions in a phased manner, as was done with respect to the other aided institutions"

**१०.३.४** मा. सर्वोच्च न्यायालयाने आपल्या ७ एप्रिल १९९७ च्या निर्णयात मा. उच्च न्यायालयाचा १४ जून १९९६ चा निर्णय रद्द केला नव्हता किंवा "सेवा निवृत्ती योजना या शिक्षकांना लागू न करण्याचा राज्यशासनाचा निर्णय घटनेतील समानतेच्या हक्कांचा (कलम १४ चा) भंग करणारा आहे" हा मा. उच्च न्यायालयाचा निष्कर्ष मा. सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावला नव्हता पुढे शासनाने सतत नकारार्थी निर्णय घेण्याची कृती करावी यासाठी मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयात "Government is not intending to

*( सहपत्र : चार )* (ठरावाचा परिच्छेद १०.८.१ पहा)

*Action to be taken when the decision of High Court is adverse to the State and is not stayed by Hon'ble the Supreme Court of India.*

## GOVERNMENT OF MAHARASHTRA

Law and Judiciary Department : Government Circular No.: 820-2014/Misc./E Branch

MADAM CAMA ROAD, HUTATMA RAJGURU CHOWK MANTRALAYA, MUMBAI - 400032.

**Date: 2nd APRIL, 2014 : CIRCULAR**

See page 101 of 2014 NUTA BULLETIN

deny the benefit to the segment of the teachers, **we appreciate the stand taken by the Government.**" असे वाक्य वापरण्यात आले होते असे शासनाने गृहित धरणे हा तर निव्वळ पोरकटपणा होता व तो पोरकटपणा पुढे १५-२० वर्षे चालू राहीला.

**१०.३.५** दरम्यानच्या काळात समाजकार्य महाविद्यालयातील प्रकरण सन १९९९ मध्ये मुंबई खंडपीठापुढे दाखल झाले. समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षकांना सेवा निवृत्ती योजना नाकारून भेदभावपूर्ण वागणूक दिली जात आहे असे याचिकाकर्त्यांचे प्रतिपादन होते. मा. मुंबई खंडपीठासमोर हे प्रकरण सुनावणीला आले तेव्हा मुख्यत्वे आयुर्वेद विद्याशाखेतील शिक्षकांच्या प्रकरणांत मा. उच्च व सर्वोच्च न्यायालयात जे निर्णय झाले त्याला धरूनच सर्व चर्चा झाली. **त्या सर्व बाबी विचारात घेऊन समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षक व कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती वेतन योजना लागू न करण्याचे राज्य शासनाचे सर्व निर्णय व आदेश मा. उच्च न्यायालयाने रद्दबादल ठरविले** व दिनांक १८ जानेवारी २००० रोजी उच्च न्यायालयाच्या मा. मुंबई खंडपीठाने पुढील प्रमाणे निर्णय दिला. :-

"The decision of the State Government to deny benefits of pension-cum-gratuity scheme to teaching and non-teaching staff of the Institutions/Colleges under the Social Welfare Department **taken on 8-7-1998 and communicated by the Director, Social Welfare Department, vide letter dated 31-3-1999 is set aside**"

**१०.३.६ "या शिक्षकांना पेन्शन योजना लागू न करण्याचा निर्णय"** मंत्रिमंडळाने ८ जुलै १९९८ च्या बैठकीत घेतला होता. राज्यशासनाचा हा निर्णय घटनेच्या कलम १४ चा भंग करणारा आहे म्हणून मा. मुंबई उच्च न्यायालयाने १८ जानेवारी २००० रोजी रद्द (SET ASIDE) ठरविला होता तर राज्य मंत्रिमंडळाने पून्हा ११ जुलै २००१ रोजीच्या बैठकीत **"या शिक्षकांना पेन्शन योजना लागू न करण्याचा निर्णय घेतला"** हे एक अत्यंत लांछनास्पद असे घटनाबाह्य वर्तन होते.

**१०.३.७** शासनाच्या या कोडगेपणाचा व निगरगट्टपणाचा शेवट काय झाला? तर मा. उच्च न्यायालयाने आता चार सहा महिन्यापूर्वी दिनांक १० जून २०१३ रोजी दिलेल्या निर्णयात "In democratic set up, no State can refuse to remove such discrimination. Since the injustice of hostile discrimination continues even today and judgments holding the field have not been implementd in letter and spirit" असे निरीक्षण नोंदविले व पुढील प्रमाणे आदेश दिले. :- "The monthly pension due to them from 1.1.2014 shall be released regularly along with others. Any default or delay in payment after stipulated period shall attract interest as per prevailing policy of the State Government.'' शासन यंत्रणेमधील दुष्टबुद्धी इतकी ताजी व टवटवीत होती की शासनाने लगेच सर्वोच्च न्यायालयात विशेष अपिलाची परवानगी मागण्यासाठी याचिका दाखल केली. मा. सर्वोच्च न्यायालयाने ती याचिका दिनांक १० जानेवारी २०१४ रोजी '**डिसमिस**' केली. आता मा. न्यायालयाने दिलेल्या निर्णयाप्रमाणे १ जानेवारी २०१४ पासून निवृत्तीवेतन या शिक्षकांना मिळायला लागले असेल असेच कुणालाही वाटेल कारण तो मा. सर्वोच्च न्यायालयाने कायम केलेला मा. उच्च न्यायलयाचा आदेश आहे पण तसे झालेले नाही व अवमान याचिका दाखल झाल्याशिवाय शासननिर्णय निर्गमित होईल असे दिसत नाही.

**१०.४** विना अनुदानित विद्यालयातून व उच्च माध्यमिक विद्यालयातून

# अमरावती विभाग शिक्षक मतदार संघातील निवडणूक सन २०१४
## नुटाच्या कार्यकारी मंडळाचा निर्णय

अमरावती विभाग शिक्षक मतदार संघातून सन २०१४ मध्ये विधान परिषदेवर एक प्रतिनिधी निवडून देण्यासाठी निवडणूक होऊ घातलेली आहे. या निवडणुकीमध्ये संघटनेची भूमिका स्पष्ट करण्यासंदर्भात पुढील प्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे. :-

२. शिक्षक किंवा पदवीधरांचे मतदार संघ हे मुख्यत्वे व्यावसायीकांच्या समस्या मांडण्यासाठी वापरले जावेत असे अपेक्षित आहे. देशाच्या घटनाकारांनी शिक्षक या व्यवसायात काम करणाऱ्या व्यावसायीकांसाठी स्वतंत्रपणे शिक्षक मतदार संघाची निर्मिती केली आहे. इतर व्यवसायांना एकत्रितरीत्या पदवीधर मतदार संघातून विधानपरिषदेवर प्रतिनिधीत्व देण्यात आले आहे. विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ ही विदर्भातील माध्यमिक शिक्षकांची सर्वात मोठी व जूनी संघटना असून या संघटनेने शिक्षकांच्या अनेक व्यावसायिक समस्या यशस्वीरित्या सोडविल्याचा त्या संघटनेला इतिहास आहे. ही वस्तुस्थिती लक्षात घेऊनच सन १९८० मध्ये विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ व नुटा या शिक्षक संघटनांनी परस्परांशी सहकार्य करण्याचा निर्णय घेतला होता व त्या निर्णयाच्या परिणामी या उभय संघटनांना थेट जबाबदार असलेले प्रतिनिधी अनुक्रमे शिक्षक व पदवीधर मतदार संघातून त्यावेळी निवडून आले होते व पुढे येत राहीले. शिक्षकांच्या, त्याबरोबरच अन्य व्यावसायीकांच्या व इतर सामाजिक समस्या सोडवण्यामध्ये आपल्या प्रतिनिधीत्वाचा अत्यंत उपयुक्त वापर या प्रतिनिधींनी केला असे दिसून येते.

३. गेले २५-३० वर्षे हे सहकार्य चालू असतांना उभय संघटनांनी काही पत्थे काटेकोरपणे पाळली होती. (१) घटनेला धरून विहित मुदतीत लोकशाही पद्धतीने आपल्या पदाधिकाऱ्यांची निवड करणे. (२) एकूणच सर्व व्यावसायीकांच्या विशेषतः शिक्षकांच्या समस्यांच्या बाबतीत सतत जागरूक राहून सभागृहात व सभागृहाबाहेर अशा समस्यांच्या सोडवणुकीसाठी प्रयत्नशील राहणे. (३) संघटनांच्या आर्थिक व्यवहारांचे चोख हिशेब ठेवून ते घटनेनुसार यथोचित प्राधिकरणांना नियमितपणे सादर करणे. (४) आपआपल्या संघटनांचे काम सांभाळतांना इतर संघटनांच्या अंतर्गत बाबीमध्ये दखल न देणे. या चतुःसूत्रिवर आधारित उभय संघटनांचे हे सहकार्य गेले अनेक वर्ष उत्तम रीतीने चालू होते.

४. सन १९८६ मध्ये नागपूर विभाग शिक्षक मतदार संघातून उमेदवार उभा करण्यावरून विदर्भ माध्यमिक शिक्षक संघात फार मोठी फूट पडली. विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष एका उमेदवाराच्या मागे, तर सरकार्यवाह हे दुसऱ्या उमेदवाराच्या मागे, विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या दोन आमदारांपैकी एक आमदार एका उमेदवाराच्या मागे, तर दुसरे आमदार दुसऱ्या उमेदवाराच्या मागे, अशी परिस्थिती निर्माण झाली. फाटाफुटीची ही परिस्थिती लक्षात घेता विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या अंतर्गत संघर्षामध्ये सहभागी व्हायचे नाही असा निर्णय नुटाच्या कार्यकारी मंडळाने घेतला व त्यातूनच त्यावेळी पुढील प्रमाणे भूमिका घेण्यात आली.:- "पसंतीच्या प्रथम क्रमांकाचे मत 'अ' यांना देणाऱ्या शिक्षक मतदारांनी पसंतीचा द्वितीय क्रमांक 'ब' यांना द्यावा. पसंतीचा प्रथम क्रमांक 'ब' यांना देणाऱ्या शिक्षक मतदारांनी पसंतीचा द्वितीय क्रमांक 'अ' यांना द्यावा. पसंतीचा प्रथम क्रमांक व द्वितीय क्रमांक असे दोनही क्रमांक द्यावेत व ते उपरोक्त दोन उमेदवारामध्येच द्यावेत." (सन १९८६ च्या ई-एक्स फाईलचे पृष्ठ ३७ पहा) दुर्दैवाने १९८६ च्या त्या निवडणुकीत विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या उभय उमेदवारांचा नागपूर शिक्षक मतदार संघात पराभव झाला. आमच्या संघटनेच्या नेत्यांनी व पदाधिकाऱ्यांनी विदर्भ माध्यमिक शिक्षक संघातील ही फूट संपुष्टात यावी यासाठी त्यानंतरच्या काळात मनापासून प्रयत्न केलेत. फाटाफुटीमुळे झालेले नुकसान लक्षात आल्यामुळे १९९२ मध्ये विदर्भ माध्यमिक शिक्षक संघातील ती फाटाफुट संपुष्टात आली होती व त्याचा परिणाम १९९२ च्या नागपूर विभाग शिक्षक मतदार संघाच्या निवडणुकीत दिसून आला व नागपूर विभाग शिक्षक मतदार संघातून विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचा उमेदवार उत्तम रीतीने यशस्वी झाला.

५. सन १९९६ मध्ये अमरावती विभाग शिक्षक मतदार संघातून विधानपरिषदेसाठी झालेल्या निवडणुकीत विदर्भ माध्यमिक शिक्षक संघामध्ये पुन्हा मोठ्या प्रमाणात फाटाफूट झाली. विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष एका उमेदवाराच्या मागे तर सरकार्यवाह हे दुसऱ्या उमेदवाराच्या मागे अशी परिस्थिती निर्माण झाली. त्याही वेळी विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या अंतर्गत वादात न पडण्याचा आमच्या संघटनेने निर्णय घेतला व १९८६ सारखीच भूमिका निश्चित केली. (सन १९९६ च्या ई-एक्स फाईलच्या पृष्ठ ८२ पहा) विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे दोनही उमेदवार सन १९९६ च्या अमरावती विभाग शिक्षक मतदार संघातील या निवडणुकीत पराभूत झाले हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. पुढे ही फाटाफूट संपुष्टात यावी यासाठी आमच्या

करण्यात आलेली सेवा वरिष्ठश्रेणी व निवडश्रेणीसाठी ग्राह्य धरण्याबाबतचा विषय अशाच स्वरुपाचा आहे. संघटनेला लेखी लिहून दिलेल्या आश्वासनांची अंमलबजावणी होत नाही, सभागृहात दिलेल्या आश्वासनांचीसुद्धा अंमलबजावणी होत नाही पण त्या दोनही विषयाबाबतची चर्चा या ठिकाणी करावयाची नसून मा. न्यायालयाने दिलेल्या निर्णयांच्याबाबतीत शासनाची वर्तणूक ही केवढी घटनाबाह्य, बेकायदेशीरपणाची व निर्ढावलेपणाची असते याचा हाही एक नमुना पहाण्यासारखा आहे.

**१०.४.१** महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक महासंघाने सन २०१४ मध्ये परीक्षा बहिष्कार आंदोलनाची नोटीस राज्य शासनाला दिली होती ती केवळ राज्य शासनाच्या नाकर्तेपणामुळेच. याचे कारण असे की, एक वर्ष अगोदर १३ मार्च २०१३ रोजी महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण विभागाच्या अप्पर मुख्य सचिवांनी (जे आता राज्याचे मुख्य सचिव आहेत) एक पत्र या संघटनेच्या अध्यक्षांना दिले होते. त्या पत्रामध्ये **"विनाअनुदानित कडील सेवा वरिष्ठ व निवडश्रेणीसाठी ग्राह्य धरणे."** या मागणीबाबत "दोन महिन्याच्या आत मंत्रिमंडळामध्ये निर्णय घेण्यात येईल" असे लेखी आश्वासन दिले पण एक वर्ष झाले तरी कोणताच शासननिर्णय शासनाने निर्गमित केला नसल्यामुळे संघटनेला पुन्हा २०१४ मध्ये आंदोलन सुरू करावे लागले.

**१०.४.२** मुळात प्रश्न मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाचाच आहे. सन २००० च्या याचिका क्रमांक ४३४६ मध्ये मा. मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक १४ सप्टेंबर २००० रोजी दिलेल्या निर्णयातील पुढील मजकूर पहा :- "It may be mentioned at this stage that the Government Resolution dated 2.9.1989 nowhere mentions that the qualified service of 12 years should be from the school which is brought on grant basis. It is required to be noted that the qualification prescribed for the aided school are the same in the unaided school and there are no separate rules for unaided school which is receiving grant and school which is not receiving grant. Under any circumstance it is not correct to assume that the 12 years service should be from aided school only."

**१०.४.३** अनेक वेळा "मा. उच्च न्यायालयाने धोरणात्मक निर्णय दिलेला आहे" हे शासनाने सभागृहात मान्य केले. पण दिनांक २७ एप्रिल २००५ रोजी **मंत्रिमंडळाने निर्णय घेतला तो मात्र हायकोर्टात गेलेल्या त्या २० याचिकाकर्त्यांच्या पुरताच मर्यादित होता. "जे कोर्टामध्ये गेले त्यांना द्यावे आणि जे इतर आहेत, त्यांना देऊ नये. असा निर्णय झालेला आहे."** असे शासनाने सभागृहात सांगितले. वर्ष दोन वर्षे विधानपरिषदेत झालेल्या झटापटीनंतर मंत्रिमंडळाने दिनांक ७ डिसेंबर २००६ रोजी **"राज्यातील सर्व मान्यता प्राप्त विना अनुदानित शाळेत केलेली सेवा वरिष्ठ व निवड श्रेणीसाठी ग्राह्य धरण्याबाबतच्या प्रस्तावास मंत्रिमंडळाने मान्यता दिलेली आहे."** असा निर्णय घेतला.

**१०.४.४** "राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी विना अनुदानित शाळेत केलेली सेवा वरिष्ठ व निवडश्रेणीसाठी ग्राह्य धरणेबाबत" या विषयावर दि. २८ नोव्हेंबर २००६ रोजी राज्य शासनाच्या शालेय शिक्षण विभागाने निर्गमित केलेला शासननिर्णय प्रत्यक्षात जेव्हा पाहिला तेव्हा असे लक्षात आले की, या शिक्षकांच्या दुर्दैवाने उपरोक्त लाभ देण्याच्या प्रयोजनासाठी प्रत्यक्षात शासननिर्णय काढतांना कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांना त्या शासन निर्णयातून वगळण्यात आलेले होते. हा शासननिर्णय निघण्याच्या पूर्वीच सन २००३ च्या याचिका क्रमांक ५०५६ मध्ये दिनांक ४ डिसेंबर २००३ रोजी मा. उच्च न्यायालयाचा जो निर्णय झालेला होता त्या निर्णयातील याचिकाकर्ते हे स्वतः कनिष्ठ महाविद्यालयीन

---

संघटनेने व पदाधिकाऱ्यांनी मनापासून प्रयत्न केलेत. सन २००२ च्या निवडणुकीच्या अगोदर अमरावती येथे बऱ्हाडे मंगल कार्यालयात विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या आमसभेमध्ये ही फाटाफूट संपुष्टात येण्यासाठी आमच्या संघटनेने केलेले प्रयत्न या आमसभेत उपस्थित असलेल्या विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या शेकडो सदस्यांनी स्वतः प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांनी पाहिले आहेत व अनुभवले आहेत. परिणामी विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या १९९६ मध्ये पराभूत झालेल्या उमेदवाराला सन २००२ च्या निवडणूकीत अतिशय उत्तम प्रकारचे यश मिळाले.

६. सन २००८ मध्ये विदर्भ माध्यमिक शिक्षक संघातील ही परिस्थिती आणखी चिघळली व फाटाफूट अतिशय टोकाला पोचली. विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या कार्यकारी मंडळाने ठरवलेल्या उमेदवाराच्या विरुद्ध खुद्द कार्यकारी मंडळातीलच तीन चार सदस्य त्या निवडणूकीत उमेदवार म्हणून उभे राहिले. संघटनेचे अध्यक्ष या नात्याने घटनेप्रमाणे त्यांना असलेल्या अधिकारांचा वापर करून त्यावेळच्या अध्यक्षांनी कार्यकारी मंडळाने ठरविलेल्या उमेदवाराच्या विरोधात आमसभेमार्फत आपली उमेदवारी जाहीर केली. त्या फाटाफुटीच्या संदर्भात आमच्या संघटनेसमोर अत्यंत मर्यादित पर्याय उपलब्ध होते. त्या संघटनेच्या अंतर्गत वादात न पडायचे ठरवून विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य असलेल्या चार पाच उमेदवारामध्ये १,२,३,४,५ असे पसंतीचे क्रमांक द्या असे सांगणे हास्यास्पद होईल, असे आमच्या संघटनेला वाटले. त्याच वेळी विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या अध्यक्षांनी आपली उमेदवारी जाहीर करतांना संघटनेच्या एकंदर कामकाजाच्या पद्धतीवर काही जाहीर आरोप केलेत. त्यातील मुख्य पुढील प्रमाणे :- (१) संघटनेमध्ये घटनेने ठरवून दिलेल्या नियमानुसार व मुदतीत निवडणुका होत नाहीत. (२) संघटनेचे हिशेब नीट ठेवल्या जात नाही व ते प्राधिकरणांना सादर केले जात नाही. (३) आजीव सदस्यांची यादी उपलब्ध करून दिली जात नाही. (४) घटनेप्रमाणे आजीव सभासदांनी दिलेले सदस्य शुल्क राष्ट्रीयकृत बँकेमध्ये फीक्स्ड डिपॉझिटमध्ये ठेवले पाहिजे असे घटनात्मक बंधन असतांना त्याचे पालन होत नाही. अशा प्रकारचे गंभीर आरोप जाहीरपणे अध्यक्षांनी नुसते केलेच नाही तर तशा कागदपत्रांचा समावेश असलेली ९२ पृष्ठांची एक पुस्तिका विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या आमसभेत वाटण्यात आली. "सन २००८ मध्ये मी संघटनेचा अध्यक्ष या नात्याने आमसभेने ठरविलेला अधिकृत उमेदवार आहे व मला निवडून दिल्यास संघटनेला जडलेल्या उपरोक्त व्याधी निर्मूलन करण्यासाठी आपण स्वतः प्रयत्न करू" असे अध्यक्षांनी जाहीर केले. त्यांच्या या आश्वासनावर विश्वास ठेवून आमच्या संघटनेने त्यांना पाठिंबा देण्याचे ठरविले व त्यांच्या याच आश्वासनावर भरवसा ठेवून विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या अनेक सदस्यांनी व शिक्षकांनी त्यांना पाठिंबा दिला व त्या पाठिंब्यामुळे ते चांगल्या बहुमताने निवडून आले.

७. संघटनेच्या अध्यक्षांनी सन २००८ च्या निवडणूकीच्या वेळी उपरोक्त जी आश्वासने दिली त्याप्रमाणे पुढच्या सहा वर्षात त्यांनी कोणतीही कृती केली नाही. यापूर्वी अनेकदा फाटाफुटी झाल्या व त्या फाटाफुटीतून विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ सावरला, तसा तो आताही सावरेल अशी आमच्या संघटनेला व सर्वच शिक्षक संघटनाप्रेमींना मोठी आशा होती. पण तसे काहीही झाले नाही. सन २०१४ च्या निवडणुकीमध्ये परिस्थिती ही खूपच बिघडलेली दिसून येते.

८. शिक्षकांचे व्यावसायिक प्रश्न सोडविण्याचा प्रदीर्घ इतिहास असलेल्या विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाशी, ज्या विदर्भ माध्यमिक संघाच्या ठरल्याप्रमाणे नियमित आमसभा होत आहेत, ज्या विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या (नियतनियमानुसार विधिमयरित्या निवडून आलेल्या) कार्यकारी मंडळाच्या नियमित बैठका होत आहेत, अशा विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या अधिकृत उमेदवारांशी सहकार्य करणे ही वेगळी गोष्ट आहे. मात्र एखाद्या मेळाव्याने ठरविलेल्या एखाद्या उमेदवारांशी किंवा कायदा व नियमांनी ज्यांचे अस्तित्व अमान्य केले आहे अशा कार्यकारी मंडळाने ठरविलेल्या उमेदवारांशी सहकार्य करण्याचा निर्णय आम्ही घेऊ शकत नाही. संघटनेची कितीही दुर्दशा झाली तरी तिचे लचके तोडत राहण्याचा हा प्रकार दुर्दैवी तर आहेच पण अत्यंत ओंगळवाणा सुद्धा आहे. विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाची आजची ही दुरावस्था संपुष्टात यावी व त्या संघटनेला जुने तेजस्वी व वैभवी दिवस पुन्हा प्राप्त व्हावे अशी आमच्या संघटनेची मनापासून इच्छा आहे व त्या इच्छेपोटीच पुढील प्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे. :-

(१) सर्व विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांनी विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे नाव सांगणाऱ्या या गटाच्या किंवा त्या गटाच्या कोणत्याही उमेदवाराला पसंतीचा कोणताही क्रमांक देऊ नये, अशी विनंती करण्यात येत आहे.

(२) विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे जुने वैभवी दिवस परत यावेत अशी मनापासून इच्छा असणाऱ्या माध्यमिक शिक्षकांनी सुद्धा वरील प्रमाणेच ठामपणे निर्णय घ्यावा. अशी त्यांना विनंती करण्यात येत आहे. कारण आपली संघटना वाचविण्याचा आजतरी त्यांच्याजवळ यापेक्षा दुसरा कोणताही मार्ग उपलब्ध नाही.

(३) इतर उपलब्ध उमेदवारामधून शिक्षक, शिक्षण व विद्यार्थी यांच्या हितास्तव झटू शकेल अशा उमेदवाराला आपल्या स्वविवेकानुसार पसंतीक्रमाचे मतदान करावे असा निर्णय घेण्यात येत आहे.

- **डॉ. प्रवीण रघुवंशी**, *अध्यक्ष, नुटा*
- **डॉ. अनिल ढगे**, *सचिव, नुटा*

शिक्षकच होते. त्या निर्णयाच्या परिच्छेद ४ मधील पुढील उल्लेख पहा. "On 15th June. 1985 the petitioner was appointed as Lecturer in Nutan Higher Secondary School. Mirajgaon. Tq. Karjat Dist. Ahmednagar. The said junior college was initially on non grant basis for the period from 1985 to 1991 and thereafter the college has been given grant-in-aid with effect from 1991." मा. उच्च न्यायालयाने शेवटच्या परिच्छेदात जो आदेश दिला त्यामध्ये 'सर्व शिक्षक' (Teachers) असा शब्द वापरला आहे. तो पुढील प्रमाणे :- "When the teachers are working in the aided school, they are entitled to revised scale on completion of twelve years even though entire service is not rendered in the aided school."

**१०.४.५** मंत्रिमंडळाने प्रथम दिनांक २७ एप्रिल २००५ रोजी पहिल्यांदा याबाबतीत निर्णय घेतला पण तो फक्त २२ याचिकाकर्त्यापुरता घेतलेला होता. पुढे विधानपरिषदेत असे सांगण्यात आले होते की आता मंत्रिमंडळाने दिनाक ७ डिसेंबर २००६ रोजी सर्व शिक्षकांच्याकरिता निर्णय घेतला आहे. प्रत्यक्ष शासननिर्णय पहिल्यावर असे लक्षात आले की सर्व शिक्षकांमधून कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांना वगळून टाकण्यात आले होते. सन २०१३ च्या परीक्षा बहिष्कार आंदोलनाच्या वेळी याबाबतीत २ महिन्यात निर्णय घेण्यात येईल असे १३ मार्च २०१३ रोजी मा. शिक्षण सचिवांनी लेखी लिहून दिले पण केले काहीच नाही. त्यामुळे संघटनेला यावर्षी पुन्हा आंदोलन सुरु करण्याशिवाय गत्यंतर राहीले नाही. आता दिनांक ५ फेब्रुवारी २०१४ रोजी "प्राथमिक/उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची **विनाअनुदानित काळातील सेवा वरिष्ठ व निवडश्रेणीसाठी ग्राह्य धरण्यात येईल.**" असा मंत्रिमंडळाने निर्णय घेतलेला आहे असे संघटनेला लेखी लिहून देण्यात आले आहे.

**१०.४.६** "अनुदानित व विना अनुदानित शिक्षकांसाठी वेगवेगळे नियम नाहीत. १२ वर्षाची सेवा अनुदानित संस्थेतीलच असली पाहिजे असा कुठेही नियम नाही" असा धोरणात्मक निर्णय सर्व शिक्षकांच्या करिता दिनांक १४ सप्टेबर २००० रोजी मा. उच्च न्यायालयाने दिला. **या गोष्टीला आता १४ वर्षे झालीत.** त्यानंतर ४ डिसेंबर २००३ रोजी मा. उच्च न्यायालयाचा दुसरा निर्णय झाला. त्यातील याचिकाकर्ते हे कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकच होते व हा निर्णय कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या बाबतीतच आहे. "हे सर्व कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक १२ वर्षाच्या सेवेनंतर वरची श्रेणी मिळविण्यास पात्र आहेत. ती सर्व सेवा अनुदानित संस्थेतच असली पाहिजे असे नाही" असा हा धोरणात्मक निर्णय आहे. **मा. उच्च न्यायालयाचा हा निर्णय होऊन दहा अकरा वर्षे झाली आहेत.** शासन सर्वोच्च न्यायालयात गेलेले नाही. जाण्याची मुदत केंव्हाच निघून गेली आहे. मा. उच्च न्यायालयाचे निर्णय होऊन दहा-पंधरा वर्षे झाली तरी शासननिर्णय निघत नसेल तर त्या शिक्षकांनी व त्यांच्या संघटनांनी आंदोलनाशिवाय दुसरे काय करावे?

**१०.५.१** एका बाजूला मा. सर्वोच्च न्यायालयाने "दिनांक १८ नोव्हेंबर २०१३ रोजी राज्य शासनाने दाखल केलेल्या SLP क्रमांक 34118 of 2013 या प्रकरणात पुढील प्रमाणे निर्णय दिलेला होता. " We are of the view that following the UGC Notification/Letter dated 4.11.2008, those teachers who have not passed NET/SET examination but who have completed six years of service as on that date should be entitled to the benefits of career advancement scheme only for the purpose of pay-

*निवृत्तिवेतन/कुटूंब निवृत्तिवेतनावरील महागाई वाढ दिनांक १ जानेवारी २०१४ पासून १०० टक्के*

# महाराष्ट्र शासन : वित्त विभाग

**निर्णय क्रमांक निमवा २०१४/प्र.क्र.४७/सेवा-४ हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, : तारीख : ०८ मे, २०१४**

***वाचा*** *- (१) शासन निर्णय क्रमांक, निमवा - २०१३/प्र.क्र.७७/सेवा-४, दिनांक ०९ ऑक्टोबर, २०१३ व २८ जानेवारी, २०१४.*

## शासन निर्णय

शासन असा आदेश देत आहे की, राज्य शासकीय निवृत्तीवेतनधारक/कुटूंब निवृत्तीवेतनधारकांना त्यांच्या निवृत्तीवेतन/कुटूंब निवृत्तीवेतन आणि महागाई निवृत्तिवेतन/महागाई कुटुंब निवृत्तीवेतन (असल्यास) यांच्या एकूण रकमेवर दि. १ जानेवारी, २०१४ पासून अनुज्ञेय महागाई वाढीचा दर ९० टक्के वरून १०० टक्के करण्यात यावा. दिनांक १ मे, २०१४ पासून सदर महागाई वाढीची रक्कम रोखीने देण्यात यावी. दि. १ जानेवारी, २०१४ ते दि. ३० एप्रिल, २०१४ या कालावधीतील महागाई वाढीच्या थकबाकीच्या आहरणाबाबत स्वतंत्रपणे आदेश निर्गमित करण्यात येतील.

२. प्रत्येक वैयक्तिक प्रकरणी देय होणाऱ्या महागाई वाढीच्या रकमेची परिगणना करण्याची जबाबदारी ही निवृत्तीवेतन संवितरण प्राधिकरण म्हणजे यथास्थिती, अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/कोषागार अधिकारी यांची राहील.

३. शासन असाही आदेश देत आहे की ज्यांना निवृत्तीवेतन योजना लागू केलेली आहे अशा मान्यता व अनुदानप्राप्त शैक्षणिक संस्था, कृषित्तर विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्न असलेली अशासकीय महाविद्यालये व कृषि विद्यापीठे यामधील निवृत्तीवेतनधारक/कुटूंब निवृत्तीवेतनधारक यांना वरील निर्णय योग्य त्या फेरफारांसह लागू राहील.

४. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम, १९६१ (सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक पाच) च्या कलम २४८ च्या परंतुकान्वये प्रदान केलेले अधिकार आणि त्यासंबंधातील इतर सर्व अधिकार यांचा वापर करुन शासन असाही आदेश देत आहे की वरील निर्णय जिल्हा परिषदांचे निवृत्तीवेतनधारक/कुटुंबनिवृत्तीवेतन धारक यांनाही लागू राहतील.

५. ज्या राज्य शासकीय कर्मचाऱ्यांनी सरकारी क्षेत्रातील उपक्रमांमध्ये/स्वायत्त संस्थामध्ये/स्थानिक संस्था इत्यादीमध्ये स्वतःला सामावून घेतल्यानंतर एक रकमी ठोक रक्कम स्वीकारलेली आहे, व जे निवृत्तीवेतनाचा १/३ इतका अंशराशीकृत भाग पुनःस्थापित करण्यासाठी तसेच शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक निअंक-१०९९/३०६/सेवा-४, दिनांक १५ नोव्हेंबर १९९९ अनुसार अंशराशीकृत रकमेच्या सुधारणेस पात्र ठरले आहेत, अशा कर्मचाऱ्यांनाही शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक निअंक १००१/५०/सेवा-४, दिनांक ९ एप्रिल २००१ च्या तरतुदीनुसार त्यांच्या पूर्ण निवृत्तीवेतनावर, वरील परिच्छेद -१ मध्ये विहित केलेल्या दिनांकापासून व विहित दराने महागाई वाढ अनुज्ञेय राहील.

६. यासंबंधीचा खर्च वरील परिच्छेदांत नमूद केलेल्या निवृत्तीवेतनधारकांची निवृत्तीवेतने ज्या अर्थसंकल्पीय शीर्षाखाली खर्ची टाकण्यात येतात. त्या शिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो त्या त्या शिर्षांतर्गत मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

७. शासनाने वेळोवेळी मंजूर केलेल्या निवृत्तीवेतनावर महागाई वाढी देण्याबाबतचे सध्या अस्तित्वात असलेले सर्व आदेश, योग्य त्या फेरफारांसह, आता मंजूर केलेल्या महागाई वाढीस देखील लागू राहतील.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०५०८१६४८१९१५०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

९. या आदेशाची इंग्रजी प्रत सोबत जोडली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

BHOSALE SATISH H

Digitally signed by Bhosale Satish H
DN : c=IN, o=Government of Maharashtra, ou=FD, postal Code=400 032, st=Maharashtra, cn=Bhosale Satish H
Date : 2014.05.08 16:52:29+05'30'

**(स.ह.भोसले)**

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

PR:- (7)NB2011P130(8)NB2012P48(9)NB2013P08(10)NB2013P91 (11)NB2013P141(12)NB2013P250(13)NB2014P115

** AF: P283 **

scales. According to us such an interim order for that limited purpose will meet ends of justice."

**१०.५.२** तर दुसऱ्या बाजूला मा. सर्वोच्च न्यायालयात दिनांक १८ नोव्हेंबर २०१३ रोजी उपरोक्त निर्णय होण्यापूर्वीच मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या निरनिराळ्या सात खंडपीठांनी या शिक्षकांच्या बाजूने निर्णय दिलेले होते. ते पुढील प्रमाणे :- (१) दिनांक १ ऑगस्ट २०१३ रोजी मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने सन २०१० च्या याचिका क्रमांक ११४७७ मध्ये दिलेला निर्णय. (P114 B2013) (२) मा. औरंगाबाद खंडपीठाने नेट-सेटमुक्त शिक्षकांच्या बाबतीत दिनांक २८ ऑगस्ट २०१३ रोजी सन २०१३ च्या याचिका क्रमांक ५२७१ मध्ये दिलेला निर्णय. (P145 B2013) (३) मा. औरंगाबाद खंडपीठाने दिनांक १३ सप्टेंबर २०१३ रोजी सन २०१३ च्या याचिका क्रमांक ४९९४ मध्ये दिलेला निर्णय. (P205 B2013) (४) दिनांक १० ऑक्टोबर २०१३ रोजी उच्च न्यायालयाच्या मा. औरंगाबाद खंडपीठाने सन २०१३ च्या याचिका क्रमांक ६६५९ मध्ये दिलेला निर्णय. (P216 B2013) (५) मा. उच्च न्यायालयाच्या मुंबई खंडपीठाने दिनांक २६ सप्टेंबर २०१३ रोजी सन २०१३ च्या याचिका क्रमांक ३१२२ मध्ये दिलेला निर्णय. (P218 B2013) (६) मा. औरंगाबाद खंडपीठाने नेट-सेटमुक्त शिक्षकांच्या बाबतीत दिनांक १७ ऑक्टोबर २०१३ रोजी सन २०१३ च्या याचिका क्रमांक १०१४९ मध्ये दिलेला निर्णय. (P234 B2013) (७) मा. औरंगाबाद खंडपीठाने नेट-सेटमुक्त शिक्षकांच्या बाबतीत दिनांक २१ नोव्हेंबर २०१३ रोजी सन २०१३ च्या याचिका क्रमांक १०२८३ मध्ये दिलेला निर्णय. (P17 B2014) मा. उच्च न्यायालयात व मा. सर्वोच्च न्यायालयात हे सारे निर्णय झाल्यावरसुद्धा उच्च शिक्षण विभागात खडखडाटच होता असे दिसून येते.

**१०.५.३** राज्याचा उच्च शिक्षण विभाग हा मा. उच्च शिक्षण मंत्र्यांच्या नेतृत्वाखाली काम करतो. त्यांच्या आदेशानुसारच शासन सर्वोच्च न्यायालयात गेले. मा. औरंगाबाद खंडपीठाने १ ऑगस्ट २०१३ रोजी सन २०१० च्या याचिका क्रमांक ११४७७ मध्ये जो निर्णय दिला त्यावरील विशेष परवानगी याचिकेवर निर्णय देतांना मा. सर्वोच्च न्यायालयाने उक्त प्रकरणी धोरणात्मक असा "अंतरिम आदेश" (Interim Order) दिला. त्याची अंमलबजावणी करण्याचे घटनात्मक कर्तव्य मा. उच्च शिक्षणमंत्री पार विसरून गेलेले आहेत असे दिसून येते.

**१०.५.४** मा. सर्वोच्च न्यायालयाने उपरोक्त आदेश दिल्यानंतर १० दिवसांनी दिनांक २८ नोव्हेंबर २०१३ रोजी मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी एका सन्माननीय विधानमंडळ सदस्यांना "त्या बिगर नेट-सेट प्राध्यापकांपैकी ज्यांनी विहीत शैक्षणिक अर्हता प्राप्त केली त्यांच्या बाबतीत सदर अध्यापकांना नियुक्तीच्या दिनांकापासून त्यांची सेवा काल्पनिकरित्या (Notional) ग्राह्य धरून त्यांना करिअर ॲडव्हान्समेंट स्कीम अंतर्गत लाभ मंजूर करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे." असे लेखी पत्रान्वये कळविले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर असे कळविणे हे न्यायालयाचा अवमान करणारे कृत्य आहे, एवढी माहिती मा. उच्च शिक्षणमंत्र्यांना नक्कीच असणार. तशी ती नसेल तर त्यांना ती माहिती करून देण्याचे काम संघटनांनाच करावे लागेल हेही उघड आहे. मात्र किती गलथानपणाने उच्च शिक्षण विभागाचे नेतृत्व केल्या जात आहे हे यावरून लक्षात येईल. "Arguments were over, case was closed for Judgement, Judgement is delivered by the highest judicial forum of the land, but a poor advocate is not tired of repeating the poorest of the poor arguments." असेच म्हणावे लागेल. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर दहा दिवसांनी मा. विधानमंडळ सदस्यांना नेट-सेट मुक्त शिक्षकांच्या बाबतीत उपरोक्त पत्र लिहिणारे राज्याचे उच्च शिक्षणमंत्री नजरेसमोर आले म्हणजे बुद्धी वैभवाचा संपूर्ण अभाव असलेला व केवळ काळा कोट अंगावर घातल्यामुळे वकील वाटणारा एखादा विचारा वकील आपल्यासमोर उभा आहे असे क्षणभर वाटल्यावाचून राहत नाही.

**१०.६** एक काळ असा होता की, संवेदनशील राज्यकर्ते व त्यांच्यासोबत नियत साफ असलेले अधिकारी असले तर न्यायालयाचा नुसता कल लक्षात आला तरी आपल्या वर्तनामध्ये बदल घडवून आणण्यास ते तयार असत. त्यामुळे आजच्या सारखी दिवसभर मा. उच्च न्यायालयात उभे राहून उच्च शिक्षण सचिवांना क्षमा मागण्याची वेळ येत नसे. याबाबत १९७६-७७ च्या दरम्यान उच्च न्यायालयातील घटनाक्रमाविषयी संघटनेचे दिवंगत ज्येष्ठ नेते श्री. संभाजीराव जाधव यांनी लिहून ठेवलेली एक आठवण लक्षात घेण्यासारखी आहे. ते लिहितात :-

"अखेरीस एकदा न्यायाधिशांनी महाराष्ट्र शासनाचे त्यावेळचे शिक्षण सचिव श्री. डी.एम. सुकथनकर यांना स्पष्टपणे सांगितले. ॲड.सुळे यांनी प्राध्यापकांसाठी जे जे मांडले आहे, ते ते सर्व युजीसीच्या म्हणण्यानुसारच मांडलेले आहे. युजीसीच्या मार्गदर्शक तत्वाबाहेर जाऊन काहीही सांगितलेले नाही. महाराष्ट्र शासनास २० टक्के रक्कम प्राध्यापकांच्या नव्या वेतनापोटी द्यावी लागत आहे. म्हणून महाराष्ट्र शासनास यूजीसी बाहेरील अटी नव्याने घालता येणार नाहीत, युजीसीचा जन्मच मुळी प्राध्यापकांच्या सेवाशर्ती व इतर बाबी संबंध देशभर समान करण्यासाठी झालेला आहे. भारतीय लोकसभेने तसा कायदा सन १९५६ मध्ये केलेला आहे. तो शासनाने प्रथम अभ्यासावा. सद्यपरिस्थितीत म्हणजे आणिबाणीच्या काळात शासनाने 'एमफक्टो'या प्राध्यापक महासंघाबरोबर तातडीने चर्चा करावी आणि तडजोड घडवून आणावी, अन्यथा ह्या याचिकेचा निकाल आजच लागल्यासारखा आहे. असे स्पष्टपणे महाराष्ट्र शासनास सुनावले. त्यामुळे शासनास आपण केलेल्या गंभीर चुका ध्यानात आल्या आणि म्हणून शासनाने दि. ६.९.१९७६ रोजी 'एमफक्टो'बरोबर बोलणी करण्याचे मान्य केले आणि याचिकेचे कामकाज स्थगित ठेवले गेले, 'एमफक्टो' या प्राध्यापक संघटनेने मिळविलेले हे एक अपूर्व यश होते, ह्यात शंकाच नाही. ॲड. सुळे आणि ॲड. मदन फडणीस यांची ह्या कामातील कामगिरी केवळ शब्दातीत अशीच मानावी लागते, दोघांनीही आपले काम विना मोबदला केले, हे तर आणखी शब्दांतीत आहे, ह्यात कसलीच शंका नाही!" न्यायालयाने दिलेला नुसता सूचक इशारा

*राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना मंजूर करण्यात येणाऱ्या महागाई भत्त्याच्या दरात दिनांक १ जानेवारी, २०१४ पासून सुधारणा करण्याबाबत.....*

***महाराष्ट्र शासन : वित्त विभाग***

***शासन निर्णय क्रमांक मभवा-१११४/प्र.क्र.१२/सेवा- ९***

**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ : तारीख : ७ मे, २०१४**

**वाचा** :- शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक मभवा-१११३/प्र.क्र.१८/सेवा-९, दिनांक ८ ऑक्टोबर, २०१३

**शासन निर्णय :**

राज्य शासकीय कर्मचारी व इतर पात्र पूर्णकालिक कर्मचाऱ्यांना महागाई भत्त्याच्या दरात सुधारणा करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

२. शासन असे आदेश देत आहे की, दिनांक १ जानेवारी, २०१४ पासून सुधारित वेतन संरचनेतील मूळ वेतनावरील (वेतनबँडमधील वेतन अधिक ग्रेड वेतन) अनुज्ञेय महागाई भत्त्याचा दर ९० टक्क्यांवरुन १०० टक्के करण्यात यावा. दि. १ मे, २०१४ पासून सदर महागाई भत्त्याच्या वाढीची रक्कम रोखीने देण्यात यावी. दि. १ जानेवारी, २०१४ ते दि. ३० एप्रिल, २०१४ या कालावधीतील महागाई भत्त्याच्या थकबाकीच्या आहरणाबाबत स्वतंत्रपणे आदेश निर्गमित करण्यात येतील.

३. महागाई भत्त्याची रक्कम प्रदान करण्यासंदर्भातील विद्यमान तरतुदी व कार्यपद्धती आहे त्याचप्रकारे यापुढेही लागू राहतील.

४. सदर आदेश सुधारित वेतनसंरचनेत वेतन अनुज्ञेय असलेल्या संस्थामधील कर्मचाऱ्यांना योग्य त्या फेरफारासह लागू राहतील.

५. यावर होणारा खर्च संबंधित शासकीय कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते या लेखा शीर्षाखाली खर्ची टाकण्यात येतात. या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकून त्याखालील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. अनुदानप्राप्त संस्था व जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या बाबतीत, संबंधित प्रमुख लेखा शीर्षाखालील ज्या उप लेखा शिर्षाखाली त्यांच्या सहाय्यक अनुदानाबाबतचा खर्च खर्ची टाकण्यात येतो, त्या उप लेखा शीर्षाखाली हा खर्च खर्ची टाकण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०१४०५०७१७२१२१२५०५असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VINAY DATTATRAY ATHAVALE

Digitally signed by Vinay Dattatray Athavale
DN : c=IN, o=Government of Maharashtra, ou=Finance Department, postal Code=400 032, st=Maharashtra, cn=Vinay Dattatray Athavale
Date : 2014.05.07 17:26:03+05'30'

**(वि. द. आठवले)**

उपसचिव, वित्त विभाग

PR:- (7)NB2011P130(8)NB2012P48(9)NB2013P08 (10)NB2013P90 (11)NB2013P140(12)NB2013P247(13)NB2014P116

**AF:P297**

लक्षात घेऊन प्रश्न निकाली काढण्याची संवेदनशिलता एका बाजूला व मा. उच्च न्यायालयाच्या निरनिराळ्या १६ खंडपीठांनी निर्णय दिल्यानंतरसुद्धा सर्वोच्च न्यायालयात जाणार व सर्वोच्च न्यायालयाचा अंतरिम आदेश झाल्यावरसुद्धा त्याची अंमलबजावणी न करता पुन्हा पुनर्विलोकन याचिका दाखल करण्याच्या उद्योगाला लागण्याचा निगरगट्टपणा दुसऱ्या बाजूला. "नेट-सेटमुक्त शिक्षकांच्या बाबतीत थकबाकीच्या रक्कमेतील ८० टक्के भार उचलायला आम्ही तयार आहोत." असे केंद्र शासनाने लेखी कळविले असतांना अशा रितीने कोर्टकचेरीमध्ये लक्षावधी रुपयाची उधळण करणारा हा राज्यकर्त्यांचा निर्लज्जपणा, लज्जास्पद या शब्दालासुद्धा लाजेने मान खाली घालायला लावणारा आहे.

**१०.७** या परिच्छेदामध्ये सुरुवातीला नमुना म्हणून चार उदाहरणे दिली आहेत. अशी कितीतरी उदाहरणे नमूद करता येतील. मा. उच्च शिक्षण मंत्र्यांची या सर्व प्रकरणाकडे पहाण्याची वृत्ती सुद्धा उपरोक्त परिच्छेदातील मजकूरावरून लक्षात येते. लहानलहान प्रकरणामध्ये सुद्धा शिक्षकांच्या बाबतीत पुन्हा पुन्हा कोर्टकचेरी करण्याची राज्यशासनाची या संदर्भातील वृत्ती स्पष्ट व्हावी हा त्यामागे हेतू आहे. नेट-सेट प्रकरणातील राज्यकर्त्यांची लबाडपणाची वृत्ती व काही अधिकाऱ्यांची लुबाडणुकीची वृत्ती यांचा इतिहास लक्षात घेता त्यामानाने नेट-सेट प्रकरणातील कोर्टकचेरी किती दीर्घ व चिवटपणे लढवावी लागेल याची कल्पना यावी हा सुद्धा उपरोक्त उदाहरणे व उच्च शिक्षण मंत्र्याची वृत्ती नमूद करण्यामागे हेतू आहे.

**१०.८.१** मंत्रालयातील निरनिराळे विभाग, विशेषतः उच्च शिक्षण विभाग, मा. उच्च न्यायालयातील निर्णय शासनाच्या विरोधात गेल्यानंतर त्याबाबत ताबडतोबच मा. सर्वोच्च न्यायालयात अपिल करण्यासाठी धावतात. विशेष अनुमती याचिका दाखल करण्याची धावपळ करतात. त्यात मार खाल्ल्यावर पूनर्विलोकन याचिका दाखल करण्यासाठी जीव ओततात. हे सर्व करीत असतांना मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयाचा त्यांच्याकडून सतत अनादर होत असतो आणि त्यामुळेच बालवाडीतील मुलांना शिकवावे इतक्या सोप्या पद्धतीने विधी विभागाला याबाबत इतर विभागांना वारंवार समज द्यावी लागते. आता नुकतेच गेल्या आठवड्यात विधी विभागाने एक परिपत्रक काढून सर्व विभागांना याबाबत स्पष्ट शब्दात समज दिलेली आहे. दिनांक २ एप्रिल २०१४ रोजी सर्व विभागांना निर्गमित केलेल्या या परिपत्रकामध्ये (Government circular No. 820-2014/Misc./E/Branch) विधी विभागाने सर्व मंत्रालयीन विभागांना स्पष्टपणे असे बजावले आहे की, "मा. उच्च न्यायालयाने शासनाच्या विरोधात एखादा निर्णय दिला असेल आणि त्या निर्णयावर आपण सर्वोच्च न्यायालयात अपील केले किंवा अपील करण्यासाठी विशेष परवानगी मागणारा अर्ज (SLP) नुसता दाखल केला म्हणजे जणू काही उच्च न्यायालयाच्या आदेशाला स्थगनादेश मिळालेला आहे असे समजून मा. उच्च न्यायालयाच्या त्या आदेशाची अंमलबजावणी करण्याची काही गरज नाही असा एक समज निरनिराळ्या खात्याच्या अधिकाऱ्यांमध्ये दिसून येतो. हा समज पूर्णपणे बेकायदेशीर, अयोग्य व चुकीचा आहे." मुळ परिपत्रकातील ही शब्दरचना जशीच्या तशी पुढीलप्रमाणे :- "It is noticed that there is a general perception that filing of appeal/SLP in the Hon'ble the Supreme Court against the judgment and order passed by the Hon'ble the High Court itself Would amount to stay to the execution/ implementation of such judgment and order. However, such perception is not legal, proper and correct." "सर्वोच्च न्यायालयाकडून स्थगनादेश मिळाला असेल तर गोष्ट वेगळी आहे. पण असा स्थगनादेश मिळाला नसेल व राज्य शासनाने केवळ विशेष अनुमती याचिका दाखल केली आहे म्हणून मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी न करणे हे पूर्णपणे बेकायदेशीर असून त्यामुळे संबंधित खात्याला व त्या खात्याच्या अधिकाऱ्यांना न्यायालयाचा अवमान केल्याच्या याचिकेला तोंड द्यावे लागेल हे त्यांनी लक्षात ठेवले पाहिजे." असेही विधी विभागाने सर्व मंत्रालयीन विभागांना पुढील शब्दात कळविले आहे. "If the appeal/SLP is filed by the State against the order of the Hon'ble the High Court, but no stay is granted to the implementation and enforcement of the order of the Hon'ble the High Court, such orders would have to be implemented failing which the concerned officer/ department may face the action for contempt of Court." महाराष्ट्र शासनाच्या विधि विभागाने दिनांक २ एप्रिल २०१४ रोजी काढलेले हे परिपत्रक **सहपत्र : चार** म्हणून सोबत दिलेले आहे.

**१०.८.२** मंत्रालयीन विभागांना, विशेषतः उच्च शिक्षण विभागाला, हे प्राथमिक बोधामृत पाजण्याची वेळ विधी विभागावर कां आली हे समजून घेण्यासारखे आहे. त्यासाठी याबाबतच्या निगरगट्टपणाचा थोडासा पूर्वेतिहास नजरेखालून घालणे आवश्यक आहे.

**(एक)** १ जानेवारी २००६ नंतर सेवानिवृत्त झालेल्या काही शिक्षकांना ५ लक्ष रूपये व काही शिक्षकांना ७ लक्ष रूपये ग्रॅच्युईटी अदा करण्याचा राज्य शासनाचा भेदभाव करणारा शासन निर्णय रद्द करणाऱ्या मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या आधारे मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने सन २०१३ च्या याचिका क्रमांक ६३६९ मध्ये दिनांक ३ सप्टेंबर २०१३ रोजी "We direct the State Government to take a policy decision on the basis of the order of the Apex Court dated 30th January, 2013, within a period of four weeks from today;" असा आदेश दिला. चार आठवड्याच्या आत शासनाने धोरणात्मक निर्णय तर घेतला नाहीच पण आकसाने पुनर्विचार याचिका (Review Petition) दाखल केली. मा. सर्वोच्च न्यायालयाने राज्य शासनाची ही पुनर्विलोकन याचिका दिनांक १३.१०.२०१३ रोजी "The review petition is accordingly dismissed." या शब्दात डिसमिस केली. **तरी अजूनही राज्य शासनाने**

***महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या सोमवार, दिनांक ७ एप्रिल २०१४ रोजी मुंबई येथील बैठकीत झालेल्या ठरावानुसार***

## नेटसेटमुक्त शिक्षकांच्या सभेचे आयोजन

(१) महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने दिनांक ७ एप्रिल २०१४ च्या बैठकीमध्ये सम्मत केलेला ठराव (२) नेटसेटमुक्त शिक्षकांबाबत मुंबई उच्च न्यायालयाच्या विविध खंडपीठांनी दिलेले निर्णय (३) सर्वोच्च न्यायालयातील संघर्षाची मजबूत तयारी करण्याबाबत करावयाच्या उपाययोजनाबाबतचा महासंघाचा ठराव इत्यादीबाबत तपशीलाने माहिती देण्याकरीता विदर्भाच्या सर्व जिल्ह्यातील नेटसेट मुक्त शिक्षकांच्या सभेचे आयोजन करण्यात आलेले आहे. सभेचा दिवस, दिनांक वेळ व स्थळ खाली दिल्याप्रमाणे आहे.

**सभेचा दिवस : रविवार,**

**सभेचा दिनांक : दिनांक २९ जून, २०१४**

**सभेची वेळ : दुपारी ३ वाजता**

***: सभेचे स्थळ :***

***श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावती***

सर्व नेटसेटमुक्त प्राध्यापकांनी उपस्थित रहावे अशी विनंती आहे.- **डॉ. अनिल ढगे, सचिव, नुटा**

**याबाबतीत धोरणात्मक निर्णय निर्गमित केलेला नाही.** हा सरळ सरळ निगरगट्टपणा आहे.

**(दोन)** १४९४० च्या प्रकरणांत मा. उच्च न्यायालयाच्या खंडपीठांनी एक डझनाच्या वर निर्णय दिलेले आहेत. कोठेही मा. सर्वोच्च न्यायालयाने स्थगनादेश दिलेला नाही. अनेक विशेष अनुमती याचिका 'डिसमिस' झाल्या. एका प्रकरणामध्ये प्रकरण दाखल करून घेण्यास "Leave granted" या शब्दात परवानगी दिली मात्र स्थगनादेश दिलेला नाही पण निगरगट्टपणा कायमच आहे.

**(तीन) समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्ती वेतन योजनेबाबत** "या शिक्षकां**ना पेन्शन योजना लागू न करण्याचा निर्णय**" मंत्रिमंडळाने ८ जुलै १९९८ च्या बैठकीत घेतला होता. राज्यशासनाचा हा निर्णय घटनेच्या कलम १४ चा भंग करणारा आहे म्हणून मा. मुंबई उच्च न्यायालयाने १८ जानेवारी २००० रोजी रद्द (SET ASIDE) ठरविला. "हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात जाण्याच्या लायकीचे नाही" असे विधि विभागाने सांगितल्यामुळे शासन सर्वोच्च न्यायालयात गेले नाही. मात्र राज्य मंत्रिमंडळाने पून्हा ११ जुलै २००१ रोजीच्या बैठकीत "**या शिक्षकांना पेन्शन योजना लागू न करण्याचा निर्णय घेतला**" हे एक अत्यंत लांछनास्पद असे घटनाबाह्य वर्तन होते. शासनाच्या या कोडगेपणाचा व निगरगट्टपणाचा शेवट काय झाला? तर आता पुन्हा मा. उच्च न्यायालयाने चार सहा महिन्यापूर्वी दिनांक १० जून २०१३ रोजी राज्य शासनाच्या विरोधात निर्णय दिला. शासनाने लगेच सर्वोच्च न्यायालयात विशेष अपिलाची परवानगी मागण्यासाठी याचिका दाखल केली. मा. सर्वोच्च न्यायालयाने ती याचिका दिनांक १० जानेवारी २०१४ रोजी '**डिसमिस**' केली. अजूनही मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने काहीही केलेले नाही. शासनाचा निगरगट्टपणा कायमच आहे.

**(चार)** "अनुदानित व विना अनुदानित शिक्षकांसाठी वेगवेगळे नियम नाहीत. १२ वर्षांची सेवा अनुदानित संस्थेतीलच असली पाहिजे असा कुठेही नियम नाही" असा धोरणात्मक निर्णय सर्व शिक्षकांच्या करिता दिनांक १४ सप्टेंबर २००० रोजी मा. उच्च न्यायालयाने दिला. **या गोष्टीला आता १४ वर्षे झालीत.** शासन सर्वोच्च न्यायालयातही गेले नाही व मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयाची शासनाने अंमलबजावणी सुद्धा केली नाही. त्यानंतर ४ डिसेंबर २००३ रोजी मा. उच्च न्यायालयाचा दुसरा निर्णय झाला. त्यातील याचिकाकर्ते हे कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकच होते व हा निर्णय कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या बाबतीतच आहे. "हे सर्व कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक १२ वर्षांच्या सेवेनंतर वरची श्रेणी मिळविण्यास पात्र आहेत. ती सर्व सेवा अनुदानित संस्थेतच असली पाहिजे असे नाही" असा हा धोरणात्मक निर्णय आहे. **मा. उच्च न्यायालयाचा हा निर्णय होऊन दहा अकरा वर्षे झाली आहेत.** शासन सर्वोच्च न्यायालयात गेलेले नाही. जाण्याची मुदत केंव्हाच निघून गेली आहे. मा. उच्च न्यायालयाचे निर्णय होवून दहा-पंधरा वर्षे झाली तरी शासननिर्णय निर्गमित होत नाही हा निगरगट्टपणाच म्हणावा लागेल.

**१०.८.३** राज्य शासनाच्या विधि विभागाला असे बोधामृत पाजणारे २ एप्रिल २०१४ चे परिपत्रक कां काढावे लागले हे स्पष्ट होण्यासाठी अधिकाऱ्यांच्या निगरगट्टपणाची वर नमूद केली एवढी उदाहरणे पूरेशी आहेत. आता नेट-सेटमुक्त शिक्षकांच्या बाबतच्या निगरगट्टपणाचा परिचय करून घेऊ. या शिक्षकांच्या बाबतीत आतापर्यंत मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या विविध खंडपीठांनी या शिक्षकांच्याबाजूने १६ निर्णय दिलेले आहेत. यातील पहिला निर्णय औरंगाबाद खंडपीठासमोर दिनांक १ ऑगस्ट २०१३ रोजी सन २०१० च्या याचिका क्रमांक ११४७७ मध्ये झाला. राज्य शासनाने त्यावर विशेष अनुमती याचिका मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केली. दिनांक १८ नोव्हेंबर २०१३ रोजीच्या आपल्या निर्णयाच्या परिच्छेद ३ नुसार मा. सर्वोच्च न्यायालयाने तशी अनुमती दिली. मात्र त्याच वेळी परिच्छेद ४ मध्ये पुढील प्रमाणे अंतरीम आदेश दिला. :- "4. We are of the view that following the UGC Notification/Letter dated 4.11.2008, those teachers who have not passed NET/SET examination but who have completed six years of service as on that date should be entitled to the benefits of career advancement scheme only for the purpose of pay-scales. According to us such an interim order for that limited purpose will meet ends of justice."

या प्रकरणामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयाला स्थगनादेश दिला काय? या प्रश्नाचे उत्तर 'होय' असे आहे. हा स्थगनादेश त्याच निर्णयाच्या परिच्छेद ५ मध्ये आहे तो पुढील शब्दात :- "5. The impugned orders passed by the High Court will remain stayed subject to the order as above." यातील "subject to the order as above." या शब्दांचा अर्थ अधिकाऱ्यांना कळण्यास अडचण जावू नये म्हणून राज्य शासनाने मोठमोठी पुस्तके अधिकृतपणे काढलेली असून ती त्या प्रत्येक अधिकाऱ्यांच्या टेबलवर शोभा वाढवित असतात. "शासन व्यवहार कोष" या महाराष्ट्र शासनाच्या भाषा संचालनालयाने प्रसिद्ध केलेल्या संदर्भ कोषामध्ये पृष्ठ ५४४ वर "उपरोक्त आदेशाच्या आधिन राहून" असा त्या शब्दाचा अर्थ सांगितला असून "प्रशासन वाक्प्रयोग" या महाराष्ट्र शासनाच्याच भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेल्या दुसऱ्या संदर्भ कोषामध्ये पृष्ठ १३४ वर "subject to ....." चा मराठीत अर्थ ".......च्या अधिन" असा सांगितला आहे. आता हा अर्थ ज्या अधिकाऱ्यांना कळणार नाही त्यांना अवमान याचिकेच्या अनर्थाला सामोरे जावे लागेल हे उघड आहे.

**११.** सर्वोच्च न्यायालयातील क्षेत्ररक्षणाच्या दृष्टीने आजच्या क्षणी समाधानकारक अशी उभारणी करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने या कामासाठी नेमलेल्या समितीच्या निर्णयाप्रमाणे मा. मुंबई खंडपीठाच्या कार्यक्षेत्रातून एक, नागपूर खंडपीठाच्या कार्यक्षेत्रातून एक व औरंगाबाद खंडपीठाच्या कार्यक्षेत्रातून एक अशा प्रकारे हस्तक्षेप याचिका दाखल करण्यात आल्या असून त्यांचे तपशील पुढील प्रमाणे आहेत.:-

(i) Intervention application submitted on 04.04.2014 in Supreme Court of India by Maharashtra Federation of University and College Organisation (MFUCTO) in the civil appeal No. 10759 of 2013 in the matter of State of Maharashtra and ors. Vs. Asha Ramdas Bidkar & ors. representing the case of NET-SET teachers in the State in general and under the area of Bombay Division Bench in particular. AOR : Dasan & Associates.

(ii) Intervention application submitted on 01.04.2014 in Supreme Court of India by Ramesh S.Sontakke and others in civil appeal No. 10759 of 2013 in the matter of State of Maharashtra and ors. Vs. Asha Ramdas Bidkar & ors. representing the cases of NET-SET teachers under the area of Nagpur Division Bench. AOR: Ad. Manish Pitale

(iii) Intervention application submitted on 05.04.2014 in Supreme Court of India by Prakash K. Walunj and others in civil appeal No. 10759 of 2013 in the matter of State of Maharashtra and ors. Vs. Asha Ramdas Bidkar & ors. representing the cases of NET-SET teachers under the area of Aurangabad Division Bench. AOR : Ad. Sudhanshu S. Chaudhari.

**१२. जबाबदारी निश्चित करणारे निर्णय :- (अ)** सहभाग याचिका दाखल करण्यामध्ये व सुनावणीच्या वेळी नेट-सेट मुक्त शिक्षकांची बाजू मांडण्याच्या कामाचे नेतृत्त्व महाराष्ट्र प्राध्यापक महासंघ करेल असा ठाम निर्धार व्यक्त करण्यात येत आहे. असे करीत असतांना विधिज्ञांचे बळ उत्तम रितीने या सुनावणीच्यावेळी महासंघातर्फे उभे करण्यात येईल असेही निर्धारपूर्वक नमूद करण्यात येत आहे. **(ब)** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या घटक संघटनांनी यासंदर्भात मोठ्या प्रमाणात सक्रिय व्हावे व अर्थबळ उभारणीची व विधीज्ञबळ उभारणीची दुसरी फळी शक्तीपूर्ण रितीने उभी करावी असाही निर्णय घेण्यात येत आहे. **(क)** नेट-सेट मुक्त शिक्षकांच्या दृष्टीने हा विषय अतिशय महत्त्वाचा असून त्या प्रत्येकाचा व्यक्तिशः सहभाग या संघर्षामध्ये असलाच पाहिजे असाही निर्णय घेण्यात येत आहे. या शिक्षकांवर झालेल्या अन्यायाचे स्वरूप अत्यंत गंभीर असून दुर्दैवाने शासनाच्या नाकर्तेपणामुळे या प्रश्नाची सोडवणूक होण्यास खूपच विलंब झालेला आहे व शेवटी हा प्रश्न न्यायालयीन संघर्षाचा भाग बनला. त्या संघर्षाच्या प्राथमिक अवस्थेमध्ये अतिशय उत्तम प्रकारचे यश मिळाले असून हे यश सर्वोच्च न्यायालयाच्या पातळीवर टिकवून ठेवण्यात संघटनेसोबतच अशा प्रत्येक शिक्षकाने सहभागी झाले पाहिजे असे ठरविण्यात येत आहे. संघटना सर्व काही करीत आहे व आता आपल्याला काहीच करण्याची गरज नाही अशी भावना मनात ठेवून या सर्व नेट-सेट मुक्त शिक्षकांनी आपल्या घरी स्वस्थ बसण्याचे ठरविले तर पश्चात्तापाची वेळ येवू शकते आणि म्हणूनच त्यांनी व्यक्तिशः सहभागी होण्याची योजना महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने निश्चित केलेली आहे.

**१३. अर्थबळ व विधिज्ञबळ उभारणीच्या निर्णयाचा आवाका** :- सन २००६ नंतर ग्रॅच्युईटीच्या संदर्भातील भेदभाव नष्ट करणारा मा. उच्च न्यायालयाचा निर्णय असो की, कुंठीत वेतनाढीबाबतचा निर्णय असो किंवा १४९४० च्या बाबतीतला मा. उच्च न्यायालयाचा निर्णय असो, प्रत्येक बाबतीत मा. सर्वोच्च न्यायालयात 'एस्.एलपी' दाखल करण्याचा राज्य शासनाने सपाटाच लावला आहे. एका व्यक्तीच्या प्रकरणात एस्.एलपी 'डिसमिस' झाली की तत्सम दुसऱ्या व्यक्तीच्या प्रकरणात तशीच याचिका दाखल करण्याचा या सपाट्यात समावेश आहे. तेवढ्यावर समाधान न होऊन प्रत्येक बाबतीत पुन्हा पुनर्विलोकन याचिका सुद्धा दाखल करण्याचे धोरण स्वीकारले गेले आहे. या प्रत्येक प्रकरणामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये उभे रहाण्यासाठी प्रत्येक वेळी (Per appearance) तीन लक्ष रुपयाचा मेहनताना ज्येष्ठ अधिवक्त्यांना ठरवून देण्यात आला आहे. या ज्येष्ठ अधिवक्त्याच्या सोबतीला प्रत्येक सुनावणीच्या वेळी ३ ते ४ इतर सहाय्यक अधिवक्ते मदतीला असतात. त्यांचा मेहनताना वेगळा. लक्षावधी रुपये आतापावेतो शासनाकडून खर्च करण्यात आलेले आहेत. पुढे शासनाने आणखी किती तयारी ठेवली आहे याचा आपल्याला जसा सहज अंदाज करता येतो, तसाच या प्रकरणामध्ये साधेपणाने संघर्ष करतो म्हटले तरी आपल्याला किती अर्थबळ उभारणी करावी लागेल याचाही आपल्याला अंदाज येऊ शकतो. मा. मुंबई उच्च न्यायालयाचे एक सेवानिवृत्त न्यायमूर्ती सर्वोच्च न्यायालयात सातत्याने शासनाचे वकील म्हणून काम करीत आहेत. उद्या यापेक्षासुद्धा मोठे विधिज्ञबळ शासनाकडून उभे केले जाईल. मा. सर्वोच्च न्यायालयातील या संघर्षामध्ये साधेपणाने लढतो म्हटले तरी कोणत्या दर्जाचे विधिज्ञबळ उभे करावे लागेल याचाही आपल्याला अंदाज येऊ शकतो. सर्वोच्च न्यायालयातील या संघर्षामध्ये फार मोठे अर्थबळ उभे करावे लागणार आहे ही गोष्ट स्पष्ट आहे. अशा अर्थबळ उभारणीमध्ये लाभान्वित व लाभवंचित अशा सर्व नेट-सेट मुक्त शिक्षकांनी निश्चितपणे सहभागी व्हावे पण या संघर्षाचे स्वरूप लक्षात घेता इतर शिक्षकांनीसुद्धा यथास्थिती या अर्थबळ उभारणीमध्ये सहभागी व्हावे असाही निर्णय घेण्यात येत आहे.

**१४. घटक संघटनांच्या स्तरावरील अर्थबळ उभारणीसाठीचे निर्णय** :- महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या घटक संघटनांनी आपापल्या क्षेत्रातील सर्व शिक्षकांच्या सभा घ्याव्यात. परिस्थितीची पूर्ण कल्पना द्यावी व मजबूत अर्थबळ उभारणी व विधिज्ञबळ उभारणीची तयारी पुढील महिन्यामध्ये पूर्ण करावी असे ठरविण्यात येत आहे. त्यासाठी प्रत्येक नेट-सेटमुक्त शिक्षकांचा आर्थिक सहभाग किती असावा याबाबतचे निर्णय त्या त्या घटकसंघटनांच्या पातळीवरच घेण्यात यावेत. मा. उच्च न्यायालयासमोरील संघर्ष आता जवळ जवळ संपुष्टात आलेला आहे, हे या ठरावाच्या सुरुवातीलाच नमूद केलेले आहे. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या वतीने मा. मुंबई खंडपीठासमोर सन २०१३ ची याचिका क्रमांक २०८२ दिनांक २८ जुलै २०१३ रोजी दाखल करण्यात आलेली आहे. मा. मुंबई खंडपीठाच्या अधिकार क्षेत्रातील शिक्षकांना आपापल्या विद्यापीठ संघटनाच्या नेतृत्त्वाखाली "आम्ही BUCTU किंवा SUTA चे सदस्य आहोत, बुक्टू किंवा सुटा ही महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाशी संलग्न असलेली पंजीबद्ध संघटना आहे, सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेल्या सुनावणीमुळे आम्ही निश्चितपणे प्रभावित होणार आहोत व त्यामुळे या सुनावणीमध्ये सहभागी होण्याची आम्हाला अनुमती असावी" अशा मार्गानेसुद्धा या प्रकरणामध्ये सहभाग याचिका दाखल करता येऊ शकतात हे लक्षात ठेवले पाहिजे. अशी ही बांधणी घटक संघटनांच्या पातळीवरून करण्यात येईल. त्या त्या खंडपीठाच्या अधिकार क्षेत्रात येणाऱ्या जेवढ्या याचिकांवर निर्णय झालेले आहेत किंवा जेवढ्या याचिका त्या त्या खंडपीठासमोर प्रलंबीत आहेत त्या प्रत्येक याचिकेच्या बाबतीत स्वतंत्रपणे किंवा त्या सर्व याचिकांच्या बाबतीत एकत्रितपणे सर्वोच्च न्यायालयात सहभाग पक्ष उभा करावा. त्यासाठी सर्वोत्तम विधिज्ञबळ त्या त्या स्तरावर उभे करावे.

**१५. अर्थबळ उभारणी, विधीज्ञबळ उभारणी व धोरणांची आखणी** :- मा. सर्वोच्च न्यायालयात सुरू झालेल्या, होत असलेल्या व होणाऱ्या या संघर्षाची ही तीन प्रमुख अंगे आहेत. एक म्हणजे अर्थबळ उभारणी दुसरे म्हणजे विधीज्ञबळाची उभारणी व तिसरे म्हणजे स्वीकारावयाच्या रणनितीची म्हणजेच धोरणात्मक प्रतिपादनाची आखणी. मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये प्रतिपादन करण्याबाबतच्या धोरणामध्ये सर्व स्तरावर एकवाक्यता असावी असे या कार्यकारी मंडळाला वाटते. अशा एकवाक्यतेच्या अभावी फार मोठे नुकसान सहन करावे लागू शकते. मा. उच्च न्यायालयापुढे झालेल्या संघर्षात काही बाबतीत दिसून आलेला धोरणात्मक विस्कळीतपणा लक्षात घेतला तर तेथे झालेल्या काही चुका ह्या निश्चितपणे टाळता आल्या असत्या असे दिसून येते. त्या चुका होऊन सुद्धा फार मोठे नुकसान झाले नाही हा योगाचाच भाग समजला पाहिजे. सर्व चुकांचे निवेदन करणे याची काही आवश्यकता आहे असे वाटत नाही. मात्र एक दोन गोष्टी लक्षात आणून देणे या कार्यकारी मंडळाला आवश्यक वाटते. (१) एक म्हणजे १६ ऑगस्ट व २६ ऑगस्ट २०११ ला सर्व शिक्षकांचा समावेश असलेला एकत्रित व एकमुखी निर्णय विद्यापीठ अनुदान आयोगाने या शिक्षकांच्या नेट-सेट मुक्ततेबाबत घेतला असतांना तो अजिबात लक्षात न घेता केंद्र शासनाचे ३० मार्च २०१० चे आदेश रद्द करण्याची याचना काही ठिकाणी मा.उच्च न्यायालयासमोर करण्यात आली. संघटनांनी ही गोष्ट लक्षात आणून दिल्यावर एका ठिकाणी (W.P.No. 4537 of 2011) याचनेच्या परिच्छेदात सुधारणा करण्यात आली. मात्र दुसऱ्या एका ठिकाणी (W.P.No. 10149 of 2010) ठिकाणी ती याचना तशीच कायम राहीली. स्वतः याचिकाकर्त्यांनीच तशी याचना केल्यामुळे न्यायालयाने हे प्रकरण पुन्हा विद्यापीठ अनुदान आयोगाकडे पाठविले व चार महिन्यात निर्णय घेण्याचे विद्यापीठ अनुदान आयोगाला आदेश दिले. केंद्र शासनाच्या उपरोक्त निर्णयानंतर विद्यापीठ अनुदान आयोगाने ८ जुलै २०११ रोजीच्या बैठकीत (ज्या बैठकीला मानव संसाधन विभागाचे प्रतिनिधीसुद्धा हजर होते) सर्वसमावेशक निर्णय घेतला व १६ ऑगस्ट व २६ ऑगस्ट २०११ च्या पत्रान्वये तो कळविला. ही गोष्ट याचिकाकर्त्यांनी मा. न्यायालयाच्या लक्षात आणून दिली असती तर चार महिन्यात निर्णय घेण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाकडे हे प्रकरण पुन्हा पाठविले गेले नसते. (२) दुसऱ्या एका प्रकरणात "नेट-सेट मुक्ततेचा निर्णय विद्यापीठ अनुदान आयोग देते पण तो कोणत्या तारखेपासून लागू होईल हे कळवित नाही" असे प्रतिपादन खुद्द याचिकाकर्त्यांनीच केल्यामुळे "दिलेले एक्झमशन कोणत्या तारखेपासून लागू होईल याबाबतचा निर्णय विद्यापीठ अनुदान आयोगाने तीन आठवड्यात कळवावा" असा मा. उच्च न्यायालयाने आदेश पारित केला. मा.उच्च न्यायालयाच्या या एका आदेशाने महाराष्ट्रातील सर्वच नेट-सेटमुक्त शिक्षक लाभान्वित झाले हे जेवढे खरे तेवढेच हेही खरे की "एकदा एक्झमशन दिले की त्या शिक्षकाची सेवा नेमणुकीच्या दिवसापासून नियमित केली जाईल असा मा. सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय आहे" ही गोष्ट मा. उच्च न्यायालयाच्या लक्षात आणून दिली असती तर तेथे वेगळा व जास्त हितकारक निर्णय होऊ शकला असता. ही दोन उदाहरणे एवढ्यासाठी नमूद करण्यात आले आहे की मा. सर्वोच्च न्यायालयात हा संघर्ष होत असतांना स्वीकारावयाच्या धोरणाबाबत महाराष्ट्रामध्ये सर्वत्र एकवाक्यता असणे हेच हितावह असेल. अशी एकवाक्यता रहावी म्हणून धोरणात्मक बाबतीत महासंघाचे कार्यकारी मंडळ व घटक संघटनांचे पदाधिकारी सातत्याने कार्यरत राहतील व याबाबतची आवश्यक कागदपत्रे पुरविण्याची व्यवस्थासुद्धा महासंघ आपल्या घटक संघटनांच्या मार्फत दृढनिश्चयाने पार पाडेल असाही निर्णय घेण्यात येत आहे.


**( प्रा.ए.टी.सानप )** — *अध्यक्ष*

**(डॉ. तापती मुखोपाध्याय)** — *सचिव*

MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS (MFUCTO)



**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **CHIEF EDITOR :** Prof. Vivek S. Deshmukh, Balaji Society, Yavatmal 445 001. **PUBLISHER :** Prof. Vivek S. Deshmukh, Balaji Society, Yavatmal 445 001. Published at NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602. PRINTED AT** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO.** MAHBIL/2001/4448 Postal Registration No. ATI/RNP/078/2012-14 Price : Rs. Five / Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of Posting **: 01.06.2014**


**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602.**

---------------------------------------------------

To,...........................................................................

.................................................................................

.................................................................................

.................................................................................